# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२३

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक ०१ मार्च, २०२३ / फाल्गुन १०, १९४४ (शके)**

**मुख्यमंत्री } यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

## वर्धा जिल्ह्यातील खरीप हंगामातील कमी पैसेवारी असलेल्या शेतकऱ्यांना शासनाच्या सवलती व सुविधेचा लाभ देण्याबाबत

**(१) * १७५०७ श्री.रामदास आंबटकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्ह्यातील १ हजार ३३९ गावांतील खरीप हंगामातील पैसेवारी ५० पैसेपेक्षा कमी असल्याने शेतकऱ्यांना मिळणाऱ्या सर्व सवलती व सुविधा देण्याची मागणी शेतकऱ्यांनी माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ५० पैसेपेक्षा कमी पैसेवारी असलेल्या शेतकऱ्यांना सवलती व सुविधेचा लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) राज्यात अंतिम पैसेवारीच्या आधारे दुष्काळ घोषित करण्याची कार्यवाही केली जात नाही. दुष्काळ व्यवस्थापन संहिता, २०१६ नुसार जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीचे मुल्यांकन करून विहित केलेल्या निकषानुसार दुष्काळ घोषित करण्याची कार्यवाही केली जाते. सदर निकषानुसार वर्धा जिल्ह्यात दुष्काळ घोषित करण्यात आलेला नसल्यामुळे सवलती व सुविधा जाहीर करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तथापि, चालू हंगामामध्ये अतिवृष्टी व पूर यामुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीसाठी वर्धा जिल्ह्याकरीता रुपये ३६६०८.२७ लक्ष इतके निविष्ठा अनुदान देण्यास मान्यता दिलेली आहे.

---

## नागपूर महानगरपालिकेतील ऐवजदार सफाई कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत

**(२) * १७३९९ श्री.प्रवीण दटके, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेच्या विविध विभागांत २० वर्षांपेक्षा जास्त वर्षांपासून कार्यरत असलेल्या ४४०७ हजार सफाई कामगारांची सेवा दिनांक २० सप्टेंबर, २०१९ रोजीच्या परिपत्रकानुसार स्थायी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्थायी कर्मचाऱ्यांना उचित लाभ देण्याबाबत शासन परिपत्रकातील अट क्र.१, २, ४ तसेच क्र.८ मध्ये सुधारणा होण्याकरीता लोकप्रतिनिधींनी दिनांक १८ जानेवारी, २०२२ रोजी लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सफाई कर्मचाऱ्यांना काम करीत असताना २० वर्षे पूर्ण झाले असल्यास त्यांना स्थायी करणे, तसेच सफाई कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाल्यास त्यांच्या नातेवाईकास नवीन प्रमाणे ऐवजदार कार्ड वितरित करणे, कर्मचाऱ्यांचे मृत्यू किंवा सेवानिवृत्ती नंतर पद व्यपगत न करता त्यांच्या नातेवाईकास लाड समितीच्या शिफारशीचा लाभ देणे, इ. प्रलंबित मागण्याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) व्यक्तिनिहाय अनुकंपा तत्वावर नियुक्तीची स्थानिक लोकप्रतिनिधींची दिनांक ०४/३/२०२२ दिनांक ०८/१०/२०२२, दिनांक १३/१०/२०२२ व दिनांक २९/११/२०२२ रोजीची पत्रे नागपूर महानगरपालिकेस प्राप्त झाली आहेत.
(३) नगरविकास विभागद्वारे निर्गमित शासन निर्णय दिनांक २० सप्टेंबर, २०१९ मधील अटीनुसार ऐवजदार कर्मचाऱ्यांना नियमित करण्यासाठी निर्माण करण्यात आलेली अधिसंख्य पदे त्यांच्या सेवानिवृत्ती नंतर आपोआप व्यपगत होत असल्याने, त्यांच्या वारसदारांना नियुक्ती देण्यासाठी कोणतेही अधिसंख्य पद निर्माण करण्यात येणार नाही अथवा व्यपगत झालेले पद पुनर्जीवित करता येणार नाही. यामुळे अशा सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसदारांना वारसाहक्काने नियुक्ती देणे शक्य नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वाळुज महानगर-३ (जि.औरंगाबाद) प्रकल्पासाठी जमिनी संपादित केलेल्या शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य करण्याबाबत

**(३) * १७०९१ श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाळूज महानगर-३ (जि.औरंगाबाद) करीता वाळुज, जोगेश्वरी व रामराई येथील ४०० शेतकऱ्यांच्या १२५० एकर जमिनीवर सिडकोने सन १९८९ मध्ये आरक्षण टाकले असून मागील ३० वर्षात सिडको प्रशासनाने या नियोजित प्रकल्पाचा विकास करण्याबाबत कोणतीही कार्यवाही केली नसून स्थानिक शेतकऱ्यांनाही विकासकामे करण्याबाबत अनुमती दिली नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिडको प्रशासनाने शेतकऱ्यांना सन १९९२ मध्ये नोटीसा देऊन जमिनीवर विकासकामे करु नये, तसेच इतर शासकीय कार्यालयांनाही नोटीसा देऊन विकासात्मक कामे थांबविण्याचे आदेश दिल्याने शेतकरी अडचणीत आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (सिडको) यांनी दिनांक १८ फेब्रुवारी, २०१९ रोजीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत विषय घेवून वाळुज महानगर प्रकल्प-३ हे सिडको अधिसूचित क्षेत्रामधून वगळण्यासाठी ठराव केला असून सदरहू ठराव शासनाच्या मान्यतेसाठी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सिडकोने संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला द्यावा किंवा शेतकऱ्यांच्या जमिनीवरील आरक्षण हटविण्याची मागणी स्थानिक शेतकऱ्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सिडकोने संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला भूधारक शेतकऱ्यांना देण्याबाबत किंवा शेतकऱ्यांच्या जमिनीवरील आरक्षण हटविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

वाळुज महानगर प्रकल्प-३ साठी सिडको "विशेष नियोजन प्राधिकरण" म्हणून नियुक्त आहे. सदर प्रकल्प हा सिडको व भूधारक यांचा २५:७५ प्रमाणात भागीदारी प्रकल्प आहे. यामध्ये प्रत्येक भूधारकाचे कमीत कमी २५% जमीन संपादन करण्याचे धोरण असून उर्वरित ७५% जमिनीवर भूधारक यांनी विकास करावयाचा आहे. भूधारकांकडील ७५% जमिनीवरील विकास करण्यास सिडकोकडून स्थगिती देण्यात आलेली नाही.

तथापि, वाढलेल्या रेडीरेकनर दराप्रमाणे प्रकल्पाच्या भूसंपादनाचा खर्च विचारात घेता प्रकल्पाची आर्थिकदृष्ट्या सुसह्यता होत नसल्याने सिडकोने संचालक मंडळाच्या ठराव क्र. १२१५७, दिनांक १८/०२/२०१९ अन्वये सदर वाळुज महानगर प्रकल्प-३ सिडको अधिसूचित क्षेत्रातून वगळण्याबाबत निर्णय घेतला आहे. सदर ठरावास अद्यापि शासनाने मान्यता दिलेली नाही.
(२) हे खरे नाही.

भूधारकांकडील ७५% जमिनीवरील विकास करण्यास सिडकोकडून कधीही स्थगिती देण्यात आली नाही.
(३) सिडको संचालक मंडळाचा ठराव क्र. १२१५७, दिनांक १८/०२/२०२० बाबत शासन स्तरावर अंतिम निर्णय झालेला नसून सदर ठराव शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) हे खरे आहे.
(५) उपरोक्त (३) प्रमाणे
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई-गोवा (रेवस-रेड्डी) सागरी महामार्गाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(४) * १७०७० श्री.प्रसाद लाड, श्री.अनिकेत तटकरे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा (रेवस-रेड्डी) सागरी महामार्गाचे काम सुमारे ४० वर्षांहून अधिक कालावधी पासून अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर महामार्गामुळे कोकण किनारपट्टीवरील ९६ पर्यटनस्थळे, शहरे व गावे जोडली जाणार असून पर्यटनासह संपूर्ण कोकणाच्या विकासाला चालना मिळेल, स्थानिकांना रोजगार उपलब्ध होऊन प्रगतीच्या व विकासाच्या संधी उपलब्ध होतील तसेच वाहतुकीवरील ताण व खर्चही कमी होणार असल्याने सदर सागरी महामार्गाचे काम प्रदीर्घ काळापासून रखडण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर महामार्गातील आगरदांडा, बागमांडला, बाणकोट व रेवस-कारंजा या प्रमुख पुलांची कामे तसेच दाभोळ, केळशी व जयगड येथील पुलांच्या जोडरस्त्यांची कामेही प्रलंबित असून मुंबई ते गोवा (रेवस-रेड्डी) सागरी महामार्गाचे काम हाती घेऊन पूर्ण करण्याकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्यामुळे कोकणवासियांमध्ये नाराजीचे वातावरण पसरलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रेवस-रेड्डी या सागरी महामार्गाचे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले काम पूर्ण करून सदर मार्ग वाहतूकीसाठी कार्यान्वित होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्ते विकास योजना सन १९८१-२००१ व २००१-२०२१ नुसार रेवस-रेड्डी हा रस्ता प्रमुख राज्य मार्ग क्र. ४ आहे. या महामार्गाच्या कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल, केंद्र शासनाच्या रस्ते व वाहतूक मंत्रालयाने राष्ट्रीय महामार्ग (सार्वजनिक बांधकाम) विभागामार्फत २०१८ मध्ये तयार करण्यात आला होता.

दरम्यान तत्कालिन मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी दिनांक ३०/०९/२०२० रोजीच्या बैठकीमध्ये सदर प्रकल्पाचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे हस्तांतरीत करण्याबाबतचे निर्देश दिले. पुढे दिनांक २५/०८/२०२१ रोजीच्या पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीतील निर्णयानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दिनांक ०६/०९/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये रेवस ते रेड्डी सागरी महामार्ग हा महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळामार्फत (MSRDC) विकसित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

रेवस रेड्डी महामार्गाची नव्याने आखणी करण्याचे ठरल्याने, सर्व्हे व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम महामंडळाने नियुक्त केलेल्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांचेमार्फत प्रगतीत आहे.

रेवस रेड्डी सागरी महामार्गाच्या संरेखेवर असणाऱ्या रेवस-कारंजा, रेवदांडा, जयगड, आगरदांडा, बाणकोट, केळशी, दाभोळ व जयगड या ठिकाणी नवीन पूल बांधणे प्रस्तावित आहे.

शासन निर्णय दिनांक २३/०२/२०२२ अन्वये रेवस ते कारंजा (धरमतर खाडीवर), जि.रायगड येथे चौपदरी मोठ्या खाडी पुलाचे बांधकाम करणे या कामाच्या रुपये ३०५७ कोटी अंदाजित खर्चाच्या व शासन निर्णय दिनांक १६/०३/२०२२ सा.बां. विभाग मंत्रालय, मुंबई अन्वये केळशी खाडीवरील मोठ्या पुलाचे बांधकाम करणे या कामाच्या रुपये १४८.४३ कोटीच्या अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. पुढील कार्यवाही प्रगतीत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उस्मानाबाद नगरपरिषदेंतर्गत भंगार चोरी प्रकरणातील दोषींवर कारवाई करण्याबाबत

**(५) * १७७१३ श्री.सुरेश धस : तारांकित प्रश्न क्रमांक १५४८६ ला दिनांक २१ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद नगरपरिषद अंतर्गत भंगार चोरी प्रकरणात रुपये ८० ते ८५ लाखांचे सामान चोरीला गेल्याप्रकरणी दोषी कर्मचारी व ठेकेदारांना जाणीवपूर्वक वाचविण्यासाठी अज्ञातांवर गुन्हा नोंद केल्याचे दिनांक ७ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जा.क्र.३८१९/२०२२, दिनांक २८ जुलै, २०२२ नुसार नगरपरिषद कर्मचारी व नगरपरिषदेमध्ये काम करणारे एक ठेकेदार जबाबदार असल्याचे निदर्शनास आले असून याप्रकरणी ६ जणांच्या नेमलेल्या चौकशी समितीमध्ये दोषींची नावे उघडकीस आली असूनही दोषींवर गुन्हा दाखल करण्याऐवजी अज्ञातांवर गुन्हा दाखल करुन दोषींना सहकार्य करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी मुख्याधिकारी हे संगनमताने सहभागी ठेकेदार व कर्मचाऱ्यांना पाठीशी घालत असल्याचा आरोप करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर व दोषींना सहकार्य करणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी पोलीस उपअधीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्याची नेमणूक करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशतः खरे आहे.

- उस्मानाबाद नगरपरिषदेअंतर्गत ३ वर्षापुर्वी अतिक्रमण मोहिमेमध्ये जप्त केलेले रुपये १३,५००/- किंमतीचे भंगार साहित्य दिनांक २४ जुलै, २०२२ च्या सुमारास चोरी झाले.
- याबाबत अज्ञात व्यक्तीविरुध्द आनंदनगर पोलीस ठाणे, उस्मानाबाद येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) अंशतः खरे आहे.

सदर प्रकरणी नगरपरिषद स्तरावर नेमलेल्या ६ सदस्यीय चौकशी समितीच्या अहवालात प्रथमदर्शनी नगरपरिषदेचा कर्मचारी दोषी असल्याचे नमूद केले होते. तद्नंतर जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी दिनांक २२ नोव्हेंबर, २०२२ पत्रान्वये मुख्याधिकारी, उमरगा नगरपरिषद यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक केली असून, सदर प्रकरणी अंतरिम चौकशी अहवाल दिनांक १७/०२/२०२३ रोजी प्राप्त झाला आहे. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालय स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(३) हे खरे नाही.

(४) सदर प्रकरणी नेमलेल्या चौकशी अधिकारी यांचा अंतरिम चौकशी अहवाल प्राप्त झाला असून, त्यानुषंगाने जिल्हाधिकारी स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## कोरोनामुळे नागपूर महानगरपालिकेतील मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना सानुग्रह अनुदान मंजूर करण्याबाबत

**(६) * १७२७८ श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नगरविकास विभागाने केंद्र शासनाच्या आरोग्य आणि कल्याण मंत्रालयाच्या दिनांक २८ मार्च, २०२० रोजीच्या आदेशानुसार राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थामधील कर्मचारी कर्तव्य बजावतांना कोरोनाची लागण होऊन मृत्यू झाल्यावर रुपये ५० लाखांचे सानुग्रह अनुदान मंजूर करण्याचा निर्णय दिनांक ४ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास घेतला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सानुग्रह अनुदानाच्या योजनेनुसार राज्यातील अशा प्रकारच्या किती कर्मचाऱ्यांना आतापर्यंत सानुग्रह अनुदान मंजूर करण्यात आले,

(३) असल्यास, सदर योजनेमध्ये राज्यातील “अ” आणि “ब” दर्जाच्या महानगरपालिकांना शासनाच्या मदतीमधून वगळण्यात आल्यामुळे “अ” आणि “ब” दर्जाच्या महानगरपालिकेतील मृत कर्मचाऱ्यांच्या वारसांना अथवा कुटुंबियांना सदर योजनेच्या सानुग्रह निधीतून लाभ देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे काय,

(४) तसेच नागपूर महानगरपालिकेमध्ये कार्यरत असणाऱ्या १८ कर्मचाऱ्यांचे रुपये ५० लाखांचे सानुग्रह अनुदान देण्याचा प्रस्ताव नगरविकास विभागाकडे प्रलंबित असून सदरहू सानुग्रह अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार नागपूर महानगरपालिकेतील कोरोनामुळे मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना/कुटुंबियांना रुपये ५० लाखांचे सानुग्रह अनुदान मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर योजनेनुसार नगरपरिषदा / नगरपंचायती तसेच “क” व “ड” वर्ग महानगरपालिकेतील कर्मचारी यांना कोरोनाची लागण होऊन मृत्यूमुखी पडलेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुक्रमे ५० लक्ष सानुग्रह सहायक अनुदान मंजूर करण्यात आलेले आहे. आजपर्यंत राज्यातील एकूण २०७ कर्मचाऱ्यांना रुपये ५० लक्षचे सानुग्रह सहायक अनुदान मंजूर करुन वितरित करण्यात आले आहे.

(३) शासन निर्णय दिनांक ०४/०८/२०२१ अन्वये “अ” वर्ग आणि “ब” वर्ग महानगरपालिकांनी रुपये ५० लक्षच्या (सानुग्रह सहाय्याची योजना त्यांच्या स्वनिधीमधून राबविण्याबाबतचे निर्देश निर्गमित करण्यात आले आहेत.

(४) उपरोक्त शासन निर्णय दिनांक ०४/०८/२०२१ मधील अटी व शर्ती नुसार “अ” व “ब” वर्ग महानगरपालिकांनी स्वनिधीमधून सानुग्रह अनुदान राबविण्याच्या योजनांबाबत दिलेल्या सूचना स्वयंस्पष्ट असल्याने नागपूर महानगरपालिकेने सादर केलेल्या प्रस्तावानुसार १० कर्मचाऱ्यांना रुपये ५० लाखांचे

सानुग्रह अनुदान नागपूर महानगरपालिकेने त्यांच्या स्वनिधीतून देणे अपेक्षित असून त्यानुसार कार्यवाही करण्याचे नागपूर महानगरपालिकेला कळविण्यात येत आहे.
(५) व (६) सदर प्रकरणाची कार्यवाही कार्यालयीन प्रणालीत असल्याने प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकोला जिल्ह्यात अतिवृष्टी व परतीच्या पावसामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(७) * १७३६५ श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्ह्यात माहे जून ते सप्टेंबर, २०२२ मधील मुसळधार पावसामुळे तसेच माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये झालेल्या परतीच्या पावसामुळे बाधित झालेल्या १ लाख २० हजार १८८ शेतकऱ्यांपैकी ९६ हजार ४२८ शेतकऱ्यांना शासनाने जाहीर केलेली आर्थिक मदत रुपये १३४ कोटी २९ लाख एवढ्या निधीचे वाटप अकोला जिल्हा प्रशासनास करण्यात आले असून उर्वरित २३ हजार ७६० शेतकरी या आर्थिक मदतीपासून वंचित राहिले असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, अकोला जिल्ह्यात अतिवृष्टी व संततधार पावसामुळे खरीप हंगामातील पिकांचे नुकसान झाले असून शासनाने अंतिम पैसेवारी ४७ पैसे असल्याचे दिनांक ३० डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास जाहीर केले असून सदरहू अंतिम पैसेवारी ५० पैसेपेक्षा कमी असल्याने ओल्या दुष्काळामुळे अकोला जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या कापूस, सोयाबीन, मूग व उडीद या पिकांचे नुकसान झाल्यामुळे ओला दुष्काळासाठी मिळणाऱ्या सर्व सवलती देण्याची मागणी शेतकऱ्यांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुसळधार व परतीच्या पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत तसेच कमी पैसेवारी असलेल्या शेतकऱ्यांना ओला दुष्काळासाठीच्या सवलती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) व (४) चालू हंगामात अकोला जिल्ह्यात अतिवृष्टी व पूर यामुळे ३३ टक्के पेक्षा जास्त शेतीपिकांचे नुकसान झाल्याने विभागीय आयुक्त, अमरावती यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार आतापर्यंत रूपये १८८४८.३४ लक्ष निधी निविष्ठा अनुदान स्वरुपात मदत म्हणून वितरित करण्यास मान्यता देण्यात आली असून त्यापैकी रूपये १३४०४.१८ लक्ष इतका निधी प्रत्यक्ष वितरित केला आहे. त्यापैकी क्षेत्रिय यंत्रणेमार्फत रुपये १३४०४.१८ लक्ष इतका निधी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा केला आहे. उर्वरित रुपये ५४४४.१६ लक्ष इतका निधी केंद्रीभूत पध्दतीने थेट लाभार्थी हस्तांतरण प्रणालीमार्फत शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येत आहे.

केंद्र शासनाच्या नैसर्गिक आपत्तीमध्ये ओला दुष्काळ अशी संज्ञा आढळून येत नाही. त्यामुळे निविष्ठा अनुदाना व्यतिरिक्त सवलती देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यातील नवीन नगरपालिका व नगरपंचायत प्रशासनाकडे कर्मचारी वर्ग करण्याबाबत

**(८)** * **१७५८८ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यात गतवर्षी अकलुज, नातेपुते, म्हाळुंग-श्रीपूर व वैराग या चार नव्या नगरपालिका, नगरपंचायतींची निर्मिती झाली असून त्यांचा आकृतीबंध अपूर्ण असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेतील ३०० कर्मचारी शासनाकडे वर्ग करण्याची प्रक्रिया रखडली असून गत दीड वर्षापासून सदरहू कर्मचारी वेतनापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन स्थानिक स्वराज्य संस्थेतील कर्मचारी नवीन नगरपालिका व नगरपंचायत प्रशासनाकडे वर्ग करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

शासनाने दिनांक १०/०२/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये सोलापूर जिल्ह्यातील नगरपरिषद अकलूज, नगरपंचायत नातेपुते, नगरपंचायत म्हाळूंग-श्रीपूर व नगरपंचायत वैराग यांचा राज्यस्तरीय संवर्गातील पदांसाठी तसेच राज्य संवर्गातील पदाव्यतिरिक्त पदांसाठी आकृतीबंध मंजूर केला आहे.

(२) व (३) • शासनाने सदरच्या नगरपरिषदा / नगरपंचायतीकरीता आकृतीबंध मंजूर केल्यानंतर राज्य संवर्गातील पदाव्यतिरिक्त पदांसाठी एकूण ७९ पदे मंजूर केली आहेत.

• त्यानुसार वैराग नगरपंचायतीच्या मंजूर पदावर ग्रामपंचायतकालीन पात्र १३ कर्मचाऱ्यांचे समावेश करण्यात आले आहे.

• दरम्यान नगरपरिषद अकलूज, नगरपंचायत नातेपुते व नगरपंचायत म्हाळूंग-श्रीपूर यामधील ग्रामपंचायतकालीन कर्मचाऱ्यांच्या सेवा विषयक बाबींची तपासणी विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे यांच्यास्तरावरुन करण्यात आली असून त्यामध्ये त्रुटी आढळून आल्याने त्रुटींची पूर्तता करुन जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्या कार्यालयाकडून तसेच संबंधित नगरपंचायती/ नगरपरिषद यांच्या कार्यालयाकडून अहवाल मागविण्यात आले. त्यामध्ये प्राप्त अहवालाची छाननी करुन ग्रामपंचायतकालीन पात्र कर्मचाऱ्यांच्या मंजूर पदावर समावेशनाची प्रक्रिया विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांच्या स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मागण्यांबाबत

**(९) * १६९४४ श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील लाखो विद्यार्थी स्पर्धा परीक्षांची तयारी करीत असून विद्यार्थ्यांसमोर विविध समस्या व अडचणी येत असून शासनाच्या माध्यमातून होणारी नोकर भरती, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत होणारी भरती, सरळसेवा भरती अशा विविध परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या समस्यांबाबत शासनाकडे निवेदने व आंदोलनाद्वारे मागणी केली असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी लोकप्रतिनिधींनी देखील आंदोलने करुन शासनाकडे स्पर्धा परीक्षांबाबत विद्यार्थ्यांच्या हिताची बाजू शासनाकडे मांडली असूनही विद्यार्थ्यांच्या मागण्या प्रलंबित आहेत, तसेच स्पर्धा परीक्षा, विद्यार्थ्यांच्या समस्या सोडविण्याची मागणी महाज्योती विद्यार्थी संघर्ष समितीने देखील मा.मुख्यमंत्री यांना दिनांक १२ डिसेंबर, २०२२ रोजी निवेदन देऊन केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांच्या मागण्यांबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) भारतीय राज्यघटनेच्या कलम ३१५ अन्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोग सांविधानिक दृष्ट्या स्वायत्त संस्था असून आयोगामार्फत परीक्षा प्रक्रिया राबविण्याबाबत धोरण ठरविले जाते. त्यामध्ये शासन स्तरावरुन कोणताही हस्तक्षेप करण्यात येत नाही. यास्तव विविध विद्यार्थी संघटनेकडून संविधानातील नमूद आयोगाच्या कामकाजाच्या अनुषंगाने प्राप्त झालेली निवेदने योग्य कार्यवाहीसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे पाठविण्यात आली असून त्याबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून उचित कार्यवाही करण्यात येते.

निवेदनातील टिसीएस व आयबीपीएस व्दारे घेतल्या जाणाऱ्या परीक्षा अभ्यासक्रमानुसारच घेण्यात यावी. या मुद्याबाबत टि.सी.एस.-आयओएन व आय.बी.पी.एस. या कंपन्यामार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षे संदर्भात, परीक्षेचे स्वरुप, परीक्षेचा अभ्यासक्रम तसेच परीक्षा केंद्र इत्यादी शासन निर्णयातील तरतुदींनुसार संबंधित विभागांशी विचार विनिमय करुन स्पर्धा परीक्षा आयोजित करण्याबाबतच्या सूचना संबंधित कंपन्यांना शासनाकडून देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील मागासवर्गीयांचे पदोन्नतीमधील आरक्षण कायम ठेवण्याबाबत

**(१०) * १७७२६ श्री.राजेश राठोड : तारांकित प्रश्न क्रमांक १६०१३ ला दिनांक २१ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र व राज्य शासनाकडून राज्यातील दलित, आदिवासी, भटके-विमुक्त, अल्पसंख्यांक यांचे पदोन्नतीतील आरक्षण बंद करुन शासकीय नोकरीतील आरक्षण संपविण्यात येत असल्यामुळे राज्यातील आरक्षण हक्क कृती समितीच्या नेतृत्वात सातत्याने आंदोलने करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या याचिकेच्या दिनांक २४ फेब्रुवारी, २०२२ च्या सुनावणी नुसार सर्व प्रशासकीय विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालये यांच्याकडून पदोन्नतीमधील मागासवर्गीयांच्या प्रतिनिधित्वाची संवर्गनिहाय माहिती संकलित केली असून सदर माहितीच्या आधारे शासन मान्यतेने मा.सर्वोच्च न्यायालयात दिनांक २० सप्टेंबर, २०२२ रोजी शपथपत्र दाखल करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, सदरहू सुनावणी घेण्यासाठी मा.सर्वोच्च न्यायालयास विनंती करण्याबाबत दिनांक ३ नोव्हेंबर, २०२२ च्या पत्रान्वये मा.सर्वोच्च न्यायालयातील शासकीय वकीलांना विनंती करण्यात आली असून त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांचे पदोन्नतीमध्ये आरक्षण कायम ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे. तथापि, आरक्षण हक्क कृती समितीचे माहे जानेवारी, २०२३ चे निवेदन शासनास प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) राज्य शासनाने मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दिनांक ०४/०८/२०१७ च्या निर्णयाविरोधात दाखल केलेली विशेष अनुमती याचिका क्र. २८३०६/२०१७ अद्याप मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. यानुषंगाने अतिरिक्त शपथपत्राद्वारे मा.सर्वोच्च न्यायालयात संवर्गनिहाय तपशील दाखल केला आहे. याशिवाय मा.सर्वोच्च न्यायालयातील वकीलांना विनंती केलेली आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाने अंतिम निवाडा/निकाल दिल्यानंतर त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सातारा जिल्ह्यातील कण्हेर व धोम धरणांकरीता जमिनी अधिगृहीत केलेल्या प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(११) * १७४०८ श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा जिल्ह्यातील कण्हेर व धोम धरणात जमिनी अधिगृहीत करण्यात आलेल्या प्रकल्पग्रस्तांचे मौजे सायगांव ता.कोरेगाव येथील सायगांव (एकंबे) येथे पुनर्वसन करण्यात आले असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सायगांवप्रमाणे सातारा व कोरेगांव तालुक्यातील २६ गावांतील गावठाणात पुनर्वसन करण्यात आलेल्या खातेदारांना राहत्या घराची जागा वाटप केलेल्या चौरस मीटर प्रमाणे त्यांच्या नावावर भोगवटादार क्रमांक १ मध्ये ७/१२ वर नोंद करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भूमी अभिलेख कार्यालयाने सन १९७८ च्या पुनर्वसन कायद्याप्रमाणे मोजणी व नकाशा तयार केले नसल्यामुळे विमुक्त जाती, भटक्या जमातीमधील नागरिकांना वापरात असलेल्या जागेवर भोगवटादार-१ म्हणून कायम करण्यास मान्यता देण्याची तसेच कोणतेही नवीन नियम लागू करण्यात येऊ नयेत, अशी मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सातारा जिल्ह्यातील धरणाकरीता जमिनी अधिगृहीत करण्यात आलेल्या प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

सातारा जिल्ह्यातील कण्हेर प्रकल्पातील बुडीत सायगांव या गावाचे कोरेगांव तालुक्यात सायगांव (एकंबे) येथे पुनर्वसन करणेत आले आहे.
(२) सातारा जिल्ह्यातील कण्हेर व धोम प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांचे कोरेगांव तालुक्यात १६ व सातारा तालुक्यात १७ गावठाणांत पुनर्वसन करणेत आलेले आहे. सदर गावठाणांपैकी कोरेगांव तालुक्यातील असगांव गावठाणातील ७/१२ प्रकल्पग्रस्तांच्या नावे करुन भोगवटादार वर्ग १ करणेत आले आहे.
(३) अशी कोणतीही मागणी करणेत आलेचे दिसून येत नाही.
(४) उर्वरित गावठाणाच्या भूखंडाचे स्वतंत्र ७/१२ तयार करणेची कार्यवाही करण्यात येत आहे. त्यानुसार स्वतंत्र ७/१२ तयार झाल्यानंतर महसूल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक १८/०५/२०१८ नुसार भूखंड भोगवटादार वर्ग १ करणेची दक्षता घेण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्ह्यातील भामा-आसखेड धरणातील जॅकवेल निविदा प्रकरणाची चौकशी करण्याबाबत

**(१२)** * **१७७१४ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील भामा-आसखेड धरणामध्ये बांधावयाच्या जॅकवेलच्या कामासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने काढलेल्या निविदेसाठी गोंडवाना इंजिनिअरिंग कंपनीने खोटी माहिती सादर केल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कंपनीने निकृष्ट दर्जाचे काम केल्याप्रकरणी मध्यप्रदेश शासनाने कंपनीची मान्यता रद्द केली असून राज्याच्या महत्वाच्या असलेल्या नागपूर स्मार्ट सिटीच्या निविदेतही उक्त कंपनीला रद्द ठरविण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिकेकडून गोंडवाना इंजिनिअरिंग कंपनीला देण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने निविदा देताना कोणतीही पडताळणी न करणाऱ्या महानगरपालिकेच्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच सदरहू निविदा रद्द करुन कंपनीवर कायदेशीर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या भामा आसखेड धरणाजवळ अशुध्द जल उपसा केंद्र बांधणे व इतर कामांच्या निविदांच्या कामांच्या निविदामधील निविदाधारक मे.गोंडवाना इंजिनिअरिंग लि. यांनी निविदेतील अट क्र. ४.२(j) तीन कामांच्या बाबतीत दाव्यांच्या पूर्वइतिहास (Litigation history) सादर केला होता.त्यानंतर, मे.गोंडवाना इंजिनिअरिंग लि. यांचेबाबत विविध तक्रारी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस प्राप्त झाल्या होत्या. त्यास अनुसरून मे.गोंडवाना इंजिनिअरिंग लि. यांचेकडून दाव्यांच्या पूर्वइतिहासाबाबत खुलासा मागविण्यात आला असता तक्रारीत नमूद केलेले दावे (Litigation) सुरु नसल्याने त्याबाबतची माहिती दाव्यांच्या पूर्वइतिहासामध्ये देण्यात आली नसल्याचे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस सदर कंपनीने कळविले आहे.
(२) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मध्य प्रदेशच्या मंडला नगरपरिषदेस सदर प्रकरणी विचारणा केली असता दिनांक १६/०९/२०२० ते १८/०६/२०२१ या काळात मे.गोंडवाना इंजिनिअर्स यांचे कंत्राट नोंदणी (contract registration) निलंबित केले होते. तसेच, नागपूर स्मार्ट सिटी संदर्भात मे.गोंडवाना इंजिनिअर्स यांची निविदा तांत्रिक बाबींची पूर्तता करत नसल्याने अपात्र केली होती, असे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस कळविले आहे.
(३) व (४) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून सदर कामाची निविदा स्वीकृतीची प्रक्रिया पूर्ण झालेली नसून दाव्यांच्या पूर्वइतिहासाबाबत कायदेशीर बाबी तपासूनच पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याचे आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी कळविले आहे.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या आगारांतील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१३) * १७८०७ श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.एकनाथराव खडसे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळात अनेक पदे रिक्त असल्याने एका व्यक्तीला दोन अथवा त्यापेक्षा जास्त पदांचा भार सांभाळावा लागत असल्याने राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या उत्पन्नावर परिणाम होत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य मार्ग परिवहन महामंडळामध्ये २५० आगार व्यवस्थापकांपैकी राज्यातील ११३ आगाराचे काम अतिरिक्त कार्यभारावर सुरु असल्याने महामंडळाच्या कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा ताण येत असून अतिरिक्त कार्यभारामुळे अधिकारी/कर्मचारी यांना निर्णय घेण्याचे मर्यादित अधिकार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे सर्वत्र वाहतूक व्यवस्था विस्कळीत होऊन ग्रामीण भागातील अनेक बस फेऱ्या वारंवार रद्द होत असल्याने सर्वसामान्य नागरिकांची गैरसोय होत असून आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सर्व आगारातील रिक्त पदे भरण्याबाबत आणि प्रतिक्षा यादीत असलेल्या सर्व वाहन चालकांना सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) राज्य मार्ग परिवहन महामंडळामध्ये सद्य:स्थितीत १८७ आगार व्यवस्थापक कार्यरत असून ६३ आगारांच्या आगार व्यवस्थापक पदांचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिकाऱ्यांकडे सोपविलेला आहे. मात्र त्याचा परिणाम राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या उत्पन्नावर होत नाही.
(३) नाही.
(४) व (५) आगार व्यवस्थापकांची रिक्त पदे बढतीने भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

महामंडळ ठराव क्र.२०२१:१०:१६ दिनांक २८/१०/२०२१ अन्वये भरती प्रक्रियेतील घटकसंवर्गातील उमेदवारांना आवश्यकतेनुसार रा.प.महामंडळात सामावून घेण्यास मा.संचालक मंडळाने मंजुरी दिली आहे. त्यानुसार सरळसेवा भरती सन २०१९ अंतर्गत चालक तथा वाहक पदातील उमेदवारांना नेमणूका देण्याबाबतची कार्यवाही विभागीय स्तरावर सुरु आहे.

-----------------

## जालना ते नांदेड दरम्यानच्या समृध्दी महामार्गाची कामे पूर्ण करण्याबाबत

**(१४) * १७१८५ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी : तारांकित प्रश्न क्रमांक १२०७६ ला दिनांक १६ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना ते नांदेड दरम्यान समृध्दी महामार्ग उभारण्याचा निर्णय शासनाने सन २०२०-२०२१ मध्ये वा त्यादरम्यान घेतला असून जालना, परतूर, मंठा, सेलू, जिंतूर, परभणी, पूर्णा व नांदेड या तालुक्यांमधील जमिनी सदर प्रकल्पासाठी संपादन करण्यासाठी संयुक्त मोजणीची कामे प्रगतीपथावर असूनही भूसंपादनाचा मोबदला अदा करण्याची कार्यवाही सुरु झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर महामार्गाच्या उभारणीसाठी आवश्यक भूसंपादन, निधी, मावेजा वाटप, जागा हस्तांतरण इ. बाबतची प्रक्रिया संथगतीने होत असल्यामुळे सदरहू कामे जलदगतीने पूर्ण करण्याची मागणी परभणी येथील सामाजिक कार्यकर्त्यांनी मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जालना ते नांदेड दरम्यान समृध्दी महामार्गाची कामे विहित मुदतीत पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

तथापि, सद्य:स्थितीत संयुक्त मोजणी पूर्ण केली असून महाराष्ट्र महामार्ग अधिनियम कलम १८(१) अन्वये अधिसूचना प्रसिध्द झाली आहे व भूसंपादनाचा मोबदला देण्याच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.

(२) हे खरे नाही.

(३) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गास जोडणाऱ्या जालना ते नांदेड द्रुतगती महामार्गासाठी महाराष्ट्र महामार्ग अधिनियम १९५५ च्या कलम १८ च्या पोट कलम (१) अन्वये तालुकानिहाय अंतिम अधिसूचना दिनांक ०३/११/२०२२ रोजी शासन राजपत्रात प्रसिध्द केल्या आहेत. संबंधित तालुक्यांच्या उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी यांचेमार्फत निवाडा घोषित करण्याच्या अनुषंगाने जमीन व निगडीत घटकांच्या मुल्यांकनाचे काम प्रगतीपथावर आहे. त्यामुळे अद्यापपावेतो सदर प्रकल्पाच्या आखणीत समाविष्ट जमिनीच्या भूसंपादनासाठी भूधारकांना कोणताही मोबदला वितरित करण्यात आलेला नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोपरी (नवी मुंबई) येथील महानगरपालिका शाळा दुरुस्तीची कामे निविदेची तांत्रिक प्रक्रिया पूर्ण होण्याआधीच सुरु केल्याबाबत

**(१५) * १७७७२ श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्रीमती उमा खापरे, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोपरी (नवी मुंबई) येथील महानगरपालिका शाळा क्रमांक ३० च्या दुरुस्तीची कामे शालेय सत्र सुरु असताना आणि निविदेची तांत्रिक प्रक्रिया पूर्ण होण्याआधीच कंत्राटदाराने सुरू केली असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या शाळेचे सन २००६ साली बांधकाम पूर्ण करण्यात आले असताना छतावर केलेल्या बांधकामाचा भार वाढल्याने सदरचे बांधकाम निकृष्ट ठरविण्यात आले आहे, त्यामुळे शाळेत शिक्षण घेणाऱ्या ८१० विद्यार्थ्यांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, १५ वर्षात शाळेची इमारत धोकादायक झाल्याप्रकरणाची शासनाने चौकशी करुन दोषी अधिकारी व कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

- अशा आशयाची तक्रार दिनांक २७/१२/२०२२ च्या पत्रान्वये महानगरपालिकेला प्राप्त झाली होती. त्याअनुषंगाने सदर दुरूस्तीची कामे स्थगित करण्यात आली होती.

(२) हे खरे नाही.

- शाळा इमारतीचे बांधकाम २००६ मध्ये पूर्ण करण्यात आले होते. त्यानंतर शाळेच्या बाजूच्या मोकळ्या जागी स्थानिक नागरिकांनी गरजेपाटी घरे बांधणेकरीता फाऊंडेशनसाठी खोदकाम केले होते.

- त्यामुळे सदर शाळा इमारतीच्या काही कॉलम्सला तडे गेल्याचे निदर्शनास आले. त्याअनुषंगाने सदर इमारतीचे आयआयटी, मुंबई यांच्याकडून स्ट्रक्चरल ऑडीट करण्यात आले.
- त्यामध्ये सदर शाळेची तात्काळ दुरूस्ती करणेबाबत आयआयटी, मुंबई यांनी सूचना केल्या होत्या. त्यानुसार सदर दुरूस्तीच्या कामाची निविदा प्रक्रिया सुरू करून, नियमानुसार राबविण्यात आली आहे.
- तथापि, दिनांक २९/१२/२०२२ ते दिनांक ०४/०२/२०२३ या कालावधीत कोकण शिक्षक मतदारसंघाची आचारसंहिता सुरू झाल्याने न्यूनतम कंत्राटदार (L१) यांना कार्यादेश देण्याची प्रक्रिया पूर्ण करता येत नव्हती.
- मात्र सदर दुरूस्तीचे काम तातडीने करणे आवश्यक असल्याने, न्यूनतम निविदाकार (L१) यांचेकडून सुरू करण्यात आले होते. त्यानुसार कॉलमला जॅकेटींग करून कॉलमचे मजबुतीकरण करून घेण्यात आले आहे.
- शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थी व शिक्षकांच्या संरक्षणाच्या दृष्टीने सदर काम त्वरीत करून घेण्यात आले. कोकण शिक्षक मतदार संघाची आचारसंहिता दिनांक ०४/०२/२०२३ रोजी संपुष्टात आली असून, कंत्राटदारास कार्यादेश देण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे.

(३) • सद्य:स्थितीत शाळा सुस्थितीत असून विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी महानगरपालिकेने दुरूस्ती केली आहे. यामध्ये कोणतीही अनियमितता झाली नसल्याने संबधितांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही, असे नवी मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशामक भरतीतील उंचीच्या अटीचा फेरविचार करुन निकषात बदल करण्याबाबत

**(१६) * १७२६३ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य अग्निशमन सेवा अकादमीच्या पाठ्यक्रमासाठी किमान उंची १६५ से.मी. असलेल्या उमेदवारांना प्रवेश देण्यात येत असतानाही मुंबई अग्निशमन दलाने अग्निशामकांची ९१० पदे भरण्यासाठी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीत १६५ सें.मी. ऐवजी १७२ सें.मी. किमान उंचीची अट घातली असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अटीमुळे राज्य अग्निशमन सेवा अकादमीचा पाठ्यक्रम पूर्ण करणाऱ्या उमेदवारांना मुंबई अग्निशमन दलातील नोकरीची संधी गमवावी लागणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशामक भरतीतील उंचीच्या अटीचा फेरविचार करण्याबाबत आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडे पत्रद्वारे मागणी करुनही कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशामक भरतीतील उंचीच्या अटीचा फेरविचार करुन निकषात बदल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

१७२ सें.मी. उंचीच्या निकषात बसणाऱ्या उमेदवारांनी राज्य अग्निशमन सेवा अकादमीतील पाठ्यक्रम पूर्ण केलेला असल्यास, अशा उमेदवारांना मुंबई अग्निशमन दलातील नोकरीत प्राधान्यक्रम म्हणून प्रमाणपत्र चाचणीत २५ गुण अधिकचे दिले जातात, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) अशा आशयाची मागणी केल्याचे पत्र अग्निशमन दलातील कर्मचाऱ्यांच्या मुंबई अग्निशमन दल लढाऊ संघटनेकडून प्राप्त झाले आहे.

त्यानुसार दिनांक १४/०९/२०२२ रोजीच्या पत्रान्वये सदर संघटनेला कळविण्यात आले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेची मे.शॉर्प सर्व्हीसेस कंपनीने फसवणूक केल्याबाबत

**(१७) * १७२०६ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या सुरक्षा विभागाने २५० पुरुष अटेन्डंट (अकुशल कामगार) पुरविण्याबाबत "ई" निविदा नोटीस नं.२ सन २०२१-२२ मध्ये प्रसिध्द करून त्यानुसार माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये मे.शॉर्प सर्व्हीसेस, सायन, मुंबई यांना रुपये १२ कोटी ८६ लाख ८८ हजारांची निविदा दोन वर्षांकरीता मंजूर करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्यक्षात मे.शॉर्प सर्व्हीसेस सायन, मुंबई यांना २५० पुरुष अटेन्डंट (अकुशल कामगार) पुरविण्याकरीता निविदा मंजूर झालेली असताना सदर कंपनीने केवळ १०० ते १२५ अकुशल कामगारांची खोटी कागदपत्रे लेखा विभागाला सादर केली असल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मे.शॉर्प सर्व्हीसेस कंपनीने ठेकेदाराच्या संगनमताने खोटी कागदपत्रे सादर करुन महानगरपालिकेची फसवणूक केली असून कंपनीच्या निविदेमध्ये मंजूर केलेल्या अकुशल कामगारांची पीएफ ची रक्कमही कंपनीने जमा केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महानगरपालिकेची फसवणूक करणाऱ्या मे.शॉर्प सर्व्हीसेस कंपनीची देयके रोखून ठेवून याप्रकरणी जबाबदार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

- कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या सुरक्षा विभागासाठी १४५ अकुशल कामगार, पाणीपुरवठा विभागासाठी ८९ व घनकचरा व्यवस्थापनासाठी १६ असे एकूण २५० अकुशल कामगार पुरविण्यासाठी ‘ई’ निविदा दिनांक ३०/०८/२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार एकूण ०४ निविदा प्राप्त झाल्यानंतर कागदपत्रांच्या छाननीअंती दिनांक २६/११/२०२१ रोजीच्या निविदा समितीच्या इतिवृत्तानुसार मे.शॉर्प सर्व्हीसेस यांची निविदा किमान वेतन कायद्यानुसार न्यूनत्तम स्वीकृती दराप्रमाणे असल्याने L-१ ठरविण्यात आली होती.
- त्यानुसार दिनांक ०७/०९/२०२२ रोजी मे.शॉर्प सर्व्हीसेस यांना कार्यादेश देण्यात आला.

(२) • अशा आशयाची तक्रार कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेस दिनांक ०५/०१/२०२३ रोजी प्राप्त झाली आहे.

(३) हे खरे नाही.

- मे.शॉर्प सर्व्हीसेस कंपनीला दिनांक ०७/०९/२०२२ रोजी कार्यादेश दिल्यानंतर कंपनीकडून माहे ऑक्टोबर, २०२२ चे मासिक देयक दिनांक १७/११/२०२२ रोजी प्राप्त झाले.
- सदर देयकासोबत २३४ अकुशल कामगारांचे E.P.F. व E.S.I.C. चे एकत्रित चलन प्राप्त झाले. त्याअनुषंगाने महानगरपालिकेच्या लेखा विभागाकडून सदर बील अदायगी करतांना GST रक्कम आकारण्याबाबत मार्गदर्शन मागविण्यात आले. सदर बाबत अभिप्राय दिनांक ०१/०२/२०२३ रोजी प्राप्त झाले. त्यानंतर संबंधित ठेकेदाराला करारनाम्यातील अट क्र. ५ व अट क्र. १८ अन्वये नमूद कागदपत्रांची पूर्तता करणेस दिनांक ०६/०२/२०२३ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(४) • ठेकेदाराने करारनाम्यातील अट क्र. ५ व अट क्र.१८ अन्वये कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर मे.शॉर्प सर्व्हीसेस यांना मासिक देयकांची अदायगी करण्यात येणार असल्याचे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई शहरातील बेस्ट प्रशासनाच्या विद्युत विभागाच्या अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम भरण्याबाबतच्या निर्णयास स्थगिती देण्याबाबत

**(१८) * १६९६१ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेचा उपक्रम असलेल्या बेस्ट प्रशासनाने दोन महिन्यांच्या मासिक देयकाची अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम भरण्याचे पत्र वीज ग्राहकांना पाठविल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज वितरण करणाऱ्या महावितरण व अदानी कंपनीकडून अशाप्रकारे अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम आकारली जात नसताना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या बेस्ट विद्युत विभागाने मुंबई शहरातील १० लाख ८० हजार ग्राहकांकडून अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम भरण्याची सक्ती केल्यामुळे वीज ग्राहकांवर आर्थिक भार येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबई शहरातील बेस्ट प्रशासनाच्या विद्युत विभागाने दोन महिन्यांच्या मासिक देयकाची अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम भरण्याच्या दिलेल्या निर्णयास स्थगिती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता, वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके आणि पॉवर क्वालिटी) विनियम २०२१, कलम १३ नुसार सदर सुरक्षा अनामत रक्कम वीज ग्राहकांनी भरणे अनिवार्य आहे. हे विनियम सर्व परवानाधारक अदानी, टाटा, महावितरण यांना लागू आहेत.
तसेच, सदर अनामत रक्कम ६ समान मासिक हफ्त्यांमध्ये भरणा करण्याचा पर्याय उपलब्ध करुन देण्यात आला आहे, असे बेस्ट प्रशासनाने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील पाणीपट्टी वाढीस स्थगिती देण्याबाबत

**(१९) * १७०४१ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील पाणीपट्टीत ७.१२ टक्क्यांपर्यंत वाढ करण्याचा निर्णय बृहन्मुंबई महानगरपालिकेने सन २०२२-२३ मध्ये घेतला असून माहे जून, २०२२ पासून पूर्वलक्षी प्रभावाने पाणीपट्टी दरवाढीचा प्रस्ताव लागू करण्याकरीता आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका तथा प्रशासक यांनी माहे डिसेंबर, २०२२ च्या अंतिम सप्ताहात मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोरोना संकटामुळे गत दोन वर्षांत आर्थिक अडचणीत असलेल्या मुंबईकरांच्या पाणीपट्टीत बृहन्मुंबई महानगरपालिकेने दरवाढ केल्यामुळे मुंबईकरांना अधिकचा आर्थिक भार सोसावा लागणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील पाणीपट्टी वाढीस स्थगिती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात दरवर्षी होणारी पाणीपट्टीमधील दरवाढ ही स्थायी समितीच्या दिनांक ०९/०५/२०१२ रोजीच्या मंजुरीनुसार पाणी पुरवठ्यावर होणारा आस्थापना खर्च, प्रशासकीय खर्च, विद्युत शक्ती खर्च, शासकीय धरणातून उपसा केलेल्या पाण्याची पाणीपट्टी, इतर प्रचालन व परिरक्षण या घटकांवर झालेल्या खर्चाच्या अनुषंगाने प्रतिवर्षी जास्तीत जास्त ८ टक्के इतक्या मर्यादेच्या अधीन राहून पाणीपट्टी दरात वाढ प्रस्तावित करण्यात येते.

त्याअनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिका तथाप्रशासक (स्थायी समिती) यांच्या दिनांक १७/१०/२०२२ रोजीच्या ठरावानुसार बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील पाणीपट्टीत दिनांक १६/०६/२०२२ पासून ७.१२ टक्क्यांपर्यंत वाढ करण्याच्या निर्णयास मंजुरी दिली आहे.
(२) व (३) पाणी पुरवठ्याकरीता होणाऱ्या खर्चात वाढ झाल्यास यापूर्वी सुध्दा पाणीपट्टीत वाढ करण्यात आलेली आहे.

पाणीपुरवठा सेवेचा अस्तित्वातील दर्जा टिकविण्यासाठी व त्या सेवेत सुधारणा घडवून आणण्यासाठी ही दरवाढ अनिवार्य आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई उपनगरातील एअरपोर्ट फनेल वासियांच्या इमारतींच्या पुनर्विकासासाठी स्वंतत्र नियमावली तयार करण्याबाबत

**(२०) * १७६०८ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव : तारांकित प्रश्न क्रमांक १४१५६ ला दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उपनगरातील विलेपार्ले, सांताक्रुझ आणि कुर्ला या परिसरातील एअरपोर्ट फनेल वासियांच्या ४०० हून अधिक इमारतींच्या पुनर्विकासासाठी विकास नियंत्रण नियमावली ३३(७) च्या धर्तीवर स्वतंत्र नियमावली तयार करण्याचा प्रस्ताव सन २०१६ पासून शासनाकडे प्रलंबित असून त्यावर निर्णय झाला नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबई उपनगरातील विलेपार्ले, सांताक्रुझ आणि कुर्ला या परिसरातील एअरपोर्ट फनेल वासियांच्या इमारतींच्या पुनर्विकासासाठी विकास नियंत्रण नियमावली ३३(७) च्या धर्तीवर स्वंतत्र नियमावली तयार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) मुंबई उपनगर मधील विलेपार्ले, सांताक्रुझ आणि कुर्ला येथील काही क्षेत्र हे एअरपोर्ट फनेल झोन ने बाधित असून सदर फनेल झोन मधील इमारतींचे उंचीवर बंधने आहेत. याअनुषंगाने एअरपोर्ट फनेल झोन मधील उंचीचे निर्बधांमुळे बाधित इमारतींचे पुनर्विकासाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरीकांकडून विनंती करण्यात आल्यानुसार तत्कालिन आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दिनांक १२/१२/२०१८ रोजी समिती गठीत केली होती. सदर समितीने बैठकी घेऊन तयार केलेला अहवाल महापालिकेस सादर केला व त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेने एअरपोर्ट फनेल झोन मधील जुन्या इमारतींच्या पुनर्विकासाबाबत दिनांक ०९/०९/२०२१ रोजीचे पत्राद्वारे प्रस्ताव सादर केला आहे. महापालिकेच्या सदरहू प्रस्तावाचे अनुषंगाने संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिनांक ३०/१२/२०२० रोजीचे पत्राद्वारे नगरविकास विभागास अभिप्राय सादर केले असून सदर अभिप्रायामध्ये महापालिकेचा प्रस्ताव उचित नसल्याबाबत कळविले असून क्लस्टर डेव्हलपमेंटच्या माध्यमातून

पुनर्विकासाबाबत शिफारस केली आहे. त्यामुळे, महापालिकेचा प्रस्ताव व संचालक, नगररचना यांनी अभिप्रायामध्ये पुनर्विकासाबाबत सुचविलेला पर्याय यामध्ये एकवाक्यता नसून एक विशिष्ट प्रस्ताव स्विकारावा अशी बाब नाही.

तद्नंतर, यासंदर्भात शासनाचे स्तरावर बैठका इ. घेण्यात आल्या असून त्यानुसार, एअरपोर्ट फनेल झोन मधील जुन्या इमारतींचा पुनर्विकास सुसह्य व्हावा याकरीता नियमावलीमध्ये विशिष्ट तरतूद करणे तसेच अशाच प्रकारे इतर निर्बंध असल्यामुळे पुनर्विकासास अडथळा येत असलेल्या क्षेत्राचा पुनर्विकास करणे शक्य होण्याकरीता बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ चे विनियम ३३ मध्ये स्वतंत्र तरतूद अंतर्भूत करण्याची बाब शासनाचे विचाराधीन आहे.
(३) लागू नाही.

-----------------

## शासनाच्या संजय गांधी निराधार अनुदान योजना व इतर विशेष सहाय्य योजनेतील जाचक अटी शिथिल करण्याबाबत

**(२१) * १७३३५ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील निराधार व अपंग इ. च्या पुनर्वसनासाठी शासनाने संजय गांधी, श्रावणबाळ यासारख्या अनेक योजना जाहीर केल्या असून सदरहू योजनेतील उत्पन्नाची मर्यादा, दरवर्षी उत्पन्नाचा दाखला देणे यासारख्या जाचक अटीमुळे लाभार्थ्यांना सदरहू योजनेचा लाभ घेता येत नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने याबाबत शासनाने निर्णय घेवून सदर योजनांसाठी आर्थिक उत्पन्नाची मर्यादा रुपये ५० हजारांपर्यंत वाढवून दरवर्षी उत्पन्नाच्या दाखल्याची अट काढून टाकण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) विशेष सहाय्य योजनांसाठी लाभार्थ्यांकरीता असलेल्या वार्षिक उत्पन्नाच्या मर्यादेत वाढ तसेच दरवर्षी उत्पन्न दाखला घेण्याबाबत अद्याप निर्णय झालेला नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शाहू, फुले, आंबेडकर अनुसूचित जाती निवासी/अनिवासी आश्रमशाळांना अनुदान देण्याबाबत

**(२२) * १७३५९ श्री.किशोर दराडे, श्री.सचिन अहिर : तारांकित प्रश्न क्रमांक १५४५० ला दिनांक २१ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २८८ केंद्रीय आश्रमशाळांना अनुदान देण्याकरीता तत्कालिन शासनाने सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून शाहू, फुले, आंबेडकर अनुसूचित जाती निवासी/अनिवासी आश्रमशाळांना २०% अनुदान मंजूर करण्याचा निर्णय दिनांक ८ मार्च, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेतला असून सदरहू आश्रमशाळांना अनुदान देण्यासाठी दिनांक ९ जानेवारी, २०२० रोजी व माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान आश्रमशाळांची तपासणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शाहू, फुले, आंबेडकर निवासी आश्रमशाळांना नियमित वेतनश्रेणीनुसार अनुदान देण्याच्या मागणीकरीता दिनांक २४ जानेवारी, २०२३ पासून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आझाद मैदानावर बेमुदत उपोषण सुरु केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजनेंतर्गत अनुदान मंजूर करण्यात आलेल्या १६५ आश्रमशाळांपैकी १६२ आश्रमशाळांचे अहवाल शासनास प्राप्त झाले असून ३ आश्रमशाळा बंद आढळून आल्याने त्यांचे तपासणी अहवाल शासनास प्राप्त झालेले नाहीत, तसेच शासनास अहवाल प्राप्त झालेल्या १६२ आश्रमशाळांना अनुदान देण्याची कार्यवाही किती दिवसात पूर्ण करणार आहेत, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने तपासणीअंती पात्र ठरलेल्या आश्रमशाळांना सन २०१९-२०२० पासून २०% व सन २०२०-२०२१ पासून ४०% अनुदान मंजूर करुन त्यासाठी आर्थिक तरतूद करण्याबाबत तसेच शिक्षक कर्मचाऱ्यांना नियमित वेतन अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) राज्यातील २८८ केंद्रीय आश्रमशाळांना अनुदान देण्याकरीता तत्कालीन शासनाने सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून शाहू, फुले, आंबेडकर निवासी/अनिवासी शाळा योजनेंतर्गत तपासणीच्या अधीन राहून २० % अनुदान मंजूर करण्याचा निर्णय दिनांक ८ मार्च,२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला असून त्याअनुषंगाने आयुक्तालयाच्या स्तरावर आश्रमशाळांची तपासणी करण्यात आलेली आहे.
(२) शाहू, फुले, आंबेडकर निवासी/अनिवासी शाळांना अनुदान देणे व इतर मागण्यांच्या अनुषंगाने दिनांक २४ जानेवारी, २०२३ पासून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आझाद मैदानावर बेमुदत उपोषण सुरू केले आहे.
(३) सदर आश्रमशाळांना अनुदान देण्याबाबत शासनस्तरावर नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) शासन निर्णय, दिनांक १५ जून, २०२१ अन्वये शाहू, फुले, आंबेडकर निवासी/ अनिवासी शाळांचा खर्च भागविण्यासाठी २२२५-एफ ५६८ या लेखाशिर्षास मान्यता देण्यात आली आहे. याबाबत शासनास प्राप्त झालेल्या तपासणी अहवालाची छाननी करून पात्र आश्रमशाळांना नियमानुसार अनुदान देण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुक्ताईनगर (जि.जळगाव) येथील भू-क्षेत्रावर रहिवास प्रयोजनार्थ भूमी अभिन्यासास मंजूरी दिल्याबाबत

**(२३) * १७६६४ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुक्ताईनगर (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथील गट नं.२४०/२/२, ६७५/२, ३७३/१, ६७९/१, ६७९/२, ६११, ३७१, २४५/१/२, २४२, ५१२/४ या भू-क्षेत्रावर नगर रचना विभागाच्या अटी व शर्तींचे उल्लंघन करुन रहिवास प्रयोजनार्थ भूमी अभिन्यासास मंजूरी दिलेली असल्याने याबाबत दिनांक ७ डिसेंबर, २०२० रोजी बिल्किस बानो आसिफ बागवान यांनी जिल्हाधिकारी, जळगाव यांचेकडे तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २२ मे, २०२१ रोजी चौकशी करुन कार्यवाही करण्याबाबत शासनाकडे पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) होय.

(३) मा.श्री.एकनाथराव खडसे, विधानपरिषद सदस्य यांनी त्यांच्या दिनांक २२/०५/२०२१ रोजीच्या निवेदनात उपस्थित केलेल्या मुद्यांबाबत चौकशी करुन त्यातील निष्कर्षांच्या आधारे कायद्यातील तरतुदीनुसार उचित कार्यवाही करुन तसा अहवाल सत्वर सादर करणेबाबत उपविभागीय अधिकारी, भुसावळ भाग भुसावळ व मुख्याधिकारी, नगरपंचायत मुक्ताईनगर यांना जिल्हाधिकारी, जळगांव यांच्याकडून निर्देशित करण्यात आलेले आहे. सदर बाबतचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे. अहवाल प्राप्त झाल्यावर शासन स्तरावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अंतर्गत मेट्रो मार्गिका ६ प्रकल्पातील बाधित झोपडीधारकांच्या सदनिका वाटपातील गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(२४) * १७८२४ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अंतर्गत प्रकल्पग्रस्तांच्या मेट्रो मार्गिका ६ (स्वामी समर्थनगर जोगेश्वरी-विक्रोळी) प्रकल्पातील बाधित झोपडीधारकांच्या सदनिका वाटपात पुनर्वसनाचे काम पाहणारे उपजिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी गैरव्यवहार केला असून सदर प्रकरणात रुपये ९० कोटींहून अधिक रुपयांचा गैरव्यवहार झाल्याबाबत प्रकल्पग्रस्तांनी शासनाकडे तक्रारी केल्या असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदनिका वाटपात अनियमितता झाल्याचे व एकच घर दोन व्यक्तींना वितरित करुन उपजिल्हाधिकारी यांनी अनियमित ओओटी वितरकांना रात्रीच कब्जा घेण्याचे कळविले असून तक्रार करणाऱ्यांना वितरण रद्द करण्याच्या धमक्या दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्रकल्पग्रस्तांच्या मेट्रो मार्गिका ६ प्रकल्पातील बाधित झोपडीधारकांच्या सदनिका वाटपात गैरव्यवहार करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) सदर प्रकरणी शासनाकडे तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे.
(३) व (४) सदर प्रकरणी विशेष पथक नेमून चौकशी करण्याच्या सूचना महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी प्राधिकरण स्तरावर सुरु आहे. चौकशीअंती दोषी असणाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल.

-----------------

## येवला (जि.नाशिक) तालुक्यातील अवकाळी पाऊसामुळे नुकसानग्रस्त झालेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(२५) * १७३४७ श्री.नरेंद्र दराडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) येवला (जि.नाशिक) तालुका व शहरात माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे सोयाबीन, कांदा व मका इ. पिकांचे नुकसान झाल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शहरातील सकल भागामध्ये व्यापाऱ्यांच्या दुकानात पाणी शिरल्यामुळे व्यापाऱ्यांच्या मालाचेही नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अवकाळी पाऊसामुळे बाधित झालेल्या शेतकरी व व्यापाऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे करुन मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय.
(२) होय.
(३) व (४) सप्टेंबर-ऑक्टोबर, २०२२ मधील अतिवृष्टीमुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीकरीता शासन निर्णय क्र.सीएलएस-२०२२/प्र.क्र.२९७/म-३, दिनांक ११/०१/२०२३ अन्वये नाशिक जिल्ह्याकरीता रूपये ८९२०.५० लक्ष इतका निधी वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
तसेच घरे/दुकानांच्या नुकसानीकरीता निधी मागणीचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, नाशिक यांच्याकडून प्राप्त झाला असून त्याच्यावर कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## राज्यात जलयुक्त शिवार अभियान २.० राबविण्याबाबत

**(२६) * १७३४२ डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ५ हजार गावांमध्ये विविध शासकीय योजनेच्या एकत्रिकरणातून जलयुक्त शिवार अभियान २.० राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अभियान किती दिवसात पूर्ण होणार आहे, याबाबत जिल्हा व तालुकानिहाय उद्दिष्ट्ये काय आहे, तसेच एका गावासाठी किती खर्च करायचा व घनमीटरचा खर्च किती याबाबत स्पष्टता नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यात जलयुक्त शिवार अभियान २.० राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

जलयुक्त शिवार अभियान २.० राबविण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक ०३ जानेवारी, २०२३ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

(२) व (३) जलयुक्त शिवार अभियान २.० सुमारे ५००० गावांमध्ये पुढील ३ वर्षात राबविण्यात येणार आहे. त्यासाठी प्रत्येक विभागातील सर्व जिल्ह्यांकरीता एकूण ८५० गावांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले असून स्थानिक परिस्थिती विचारात घेऊन विभागातील जिल्हा निहाय गावांची संख्या उद्दिष्टाच्या मर्यादेत निश्चित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

जलयुक्त शिवार अभियानांतर्गत लोकसहभागातून होणाऱ्या नाला खोलीकरण/ रुंदीकरणाच्या कामाकरीता ग्रामपंचायत, अशासकीय संस्था, खाजगी व्यक्ती यांनी यंत्रसामुग्री उपलब्ध करुन दिल्यास प्रती घन मीटर इंधनासह यंत्रभाडे यासाठी रुपये ३०/- एवढा कमाल दर दिनांक १७ मे, २०१९ च्या परिपत्रकान्वये निश्चित करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अधिसंख्य पदावर वर्ग केलेल्या कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत

**(२७) * १६९२५ श्री.चंद्रशेखर बावनकुळे : तारांकित प्रश्न क्रमांक १६२०० ला दिनांक २१ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या १२५०० स्थायी कर्मचाऱ्यांना दिनांक २१ डिसेंबर, २०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार ११ महिन्यांसाठी अधिसंख्य पदावर वर्ग केले असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील ३१ महिन्यांपासून १००० अधिसंख्य कर्मचारी सेवानिवृत्त झाले असून त्यांना पेंशन व इतर लाभ मिळाले नसल्याने सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला असून अधिसंख्य कर्मचाऱ्यांना वार्षिक वेतनवाढ व महागाई भत्ता देण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अधिसंख्य सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना पेंशन, ग्रॅज्युएटी व इतर लाभ तथा मृत कर्मचाऱ्यांच्या वारसांना पेंशन व इतर लाभ तसेच शासन निर्णयानुसार सेवा समाप्त कर्मचाऱ्यांना सेवेत घेण्याबाबत, वार्षिक वेतनवाढ व इतर सेवाविषयक लाभ देणेबाबत कर्मचाऱ्यांनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील अधिसंख्य कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अनुसूचित जमातीच्या जात प्रमाणपत्राच्या आधारे शासन सेवेत नियुक्त झालेल्या व जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या/ जात वैधता प्रमाणपत्र सादर न केलेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या सेवा ११ महिन्याच्या कालावधी करीता अथवा त्यांच्या सेवा निवृत्तीच्या दिनांकापर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तो पर्यंत तात्पुरत्या स्वरुपात अधिसंख्य पदावर वर्ग करण्याचे आदेश दिनांक २१/१२/२०१९ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेले आहेत. सामान्य प्रशासन विभागास आतापर्यंत प्राप्त झालेल्या माहितीनुसार ४९९९ अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या सेवा अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आलेल्या आहेत.
(२), (३) व (४) दिनांक २१/१२/२०१९ च्या शासन निर्णयानुसार अधिसंख्य पदावर वर्ग केलेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांना दिनांक १४/१२/२०२२ च्या शासन निर्णयान्वये पदोन्नती व अनुकंपा धोरण वगळून अन्य सेवाविषयक तसेच सेवा निवृत्ती विषयक लाभ देण्याचा निर्णय घेतला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्ह्याकरीता वाढीव निधी मंजूर करुन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत

**(२८) * १७६८७ श्री.प्रविण पोटे-पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यात अतिवृष्टी व सततच्या पावसामुळे १.७१ लाख हेक्टर मधील शेतीपिकांचे नुकसान झाल्याचे माहे डिसेंबर, २०२२ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा प्रशासनाने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळणेकरीता रुपये २७८ कोटींची वाढीव मागणी शासनाकडे केली असून निधी मागणीचा प्रस्ताव मागील दोन महिन्यापासून शासनाकडे मंजूरीकरीता प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वाढीव निधी मंजूर करुन अमरावती जिल्ह्यातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अमरावती जिल्ह्यातील सततच्या पावसामुळे शेतीपिकांच्या झालेल्या नुकसानीकरीता रुपये २७७.५९ कोटी इतक्या निधी मागणीचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, अमरावती यांच्याकडून प्राप्त झाला आहे, हे खरे आहे.

(३) व (४) सततच्या पावसामुळे शेतीपिकांच्या झालेल्या नुकसानीकरीता द्यावयाच्या मदतीसाठी सततच्या पावसाचे निकष निश्चित करण्याकरीता कृषी विभागाच्या अखत्यारित अपर मुख्य सचिव (नियोजन) यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आलेली आहे. समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्याबाबात पुढील कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## अलिबाग (जि.रायगड) शहरात सी.सी.टि.व्ही. कॅमेरे बसविणेबाबत

**(२९) * १६९८० श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) या पर्यटन ठिकाणी दररोज हजारोंच्या संख्येने देशी-विदेशी पर्यटक येत असून शहराला पर्यटनाचा दर्जा मिळाल्याने अलिबाग शहरात सी.सी.टि.व्ही. कॅमेरे बसविण्याबाबतचा प्रस्ताव अलिबाग नगरपरिषदेने शासनाकडे दोन वर्षांपूर्वी सादर केला असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अलिबाग शहरात वाढत्या पर्यटन संख्येमुळे कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण होऊ शकते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सी.सी.टि.व्ही. कॅमेरे बसविण्याबाबतचा प्रस्ताव मंजूर करुन अलिबाग शहरात सी.सी.टि.व्ही. यंत्रणा कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अलिबाग नगरपरिषदेकडून अलिबाग शहरातील महत्वाच्या ठिकाणी सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सी.सी.टि.व्ही. व संपर्क ध्वनी यंत्रणा बसविण्याकरीता सन २०२१-२२ व २०२२-२३ मध्ये जिल्हा नियोजन समिती, रायगड यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता, हे खरे आहे.

(२) व (३) अलिबाग नगरपरिषदेने जिल्हा नियोजन समिती, रायगड यांचेकडे सादर करण्यात आलेले प्रस्ताव नामंजूर करण्यात आले. तथापि, कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता विचारात घेऊन विद्यमान पालकमंत्री जिल्हा रायगड यांचे निर्देशानुसार अलिबाग शहरात सी.सी.टि.व्ही. यंत्रणा कार्यान्वित करण्याकरीता पोलीस विभागामार्फत माहे जानेवारी, २०२३ मध्ये प्राथमिक सर्व्हे करण्यात आला असून याबाबतचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीस सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे महानगरपालिकेच्या डॉ. अरविंद बारटक्के दवाखान्यात कोरोनाकाळात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३०) * १७१५८ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील तारणे येथील महानगरपालिकेच्या डॉक्टर अरविंद बारटक्के दवाखान्यात कोरोनाकाळात स्वॅब सेंटरमधून बनावट अहवाल (रिपोर्ट) व तपासण्याचे रेकॉर्ड तयार करुन रुपये ८० ते ९० लाखांचा गैरव्यवहार झाल्याची लेखी तक्रार सदर दवाखान्यातील डॉक्टर सतिश कोळसुदे यांनी वारजे पोलिसांकडे दिनांक ३ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वारजे पोलीस स्टेशन यांनी तपास पूर्ण करुन याबाबतचा लेखी अहवाल दिनांक २७ सप्टेंबर, २०२२ रोजी आयुक्त, पुणे महानगरपालिका व आरोग्य प्रमुख यांचेकडे देऊन याप्रकरणी पुणे महानगरपालिकेने रितसर तक्रार दाखल करण्याची विनंती केली असूनही अद्यापि पुणे महानगरपालिका प्रशासनाने पोलिसांकडे पुढील कारवाईबाबत कोणतीच तक्रार वा सूचना दाखल केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आयुक्त, पुणे महानगरपालिका व आरोग्य प्रमुख यांनी डॉक्टर सतिश कोळसुदे यांच्या तक्रारीनुसार तसेच पोलिसांच्या अहवालानुसार पुढील कारवाई करण्यास मान्यता न देण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पुणे महानगरपालिकेच्या डॉक्टर अरविंद बारटक्के दवाखान्यात कोरोनाकाळात स्वॅब सेंटरमधून बनावट अहवाल (रिपोर्ट) व तपासणी करुन गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) या प्रकरणी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वारजे पोलीस स्टेशन यांचे दिनांक २७/०९/२०२२ रोजीचे पत्र महानगरपालिकेस प्राप्त झाले असून या पत्रात अनियमितता झालेली असून यातील फसवणूकीची विभागामार्फत चौकशी होऊन नक्की किती रकमेची फसवणूक झालेली आहे, त्याबाबत खातरजमा करून त्यासंबंधी पोलीस ठाण्यामध्ये तक्रार करण्याबाबत कळविलेले आहे.

या प्रकरणी चौकशी करण्याकरीता महानगरपालिकेमार्फत त्रिसदस्यीय समिती स्थापन करण्यात आली होती. त्रिसदस्यीय समितीने दिनांक १६/१२/२०२२ रोजी चौकशी अहवाल आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचेकडे सादर केलेला आहे.

(४) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वारजे पोलीस स्टेशन यांचे दिनांक २७/०९/२०२२ रोजीचे पत्र व त्रिसदस्य समितीने दिनांक १६/१२/२०२२ च्या चौकशी अहवालाबाबत तात्काळ निर्णय घेवून पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना दिनांक २०/०२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वरळी (मुंबई) येथील सागरी मार्गाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(३१) * १८०५८ श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दक्षिण मुंबईतील वाहतूक कोंडी सोडविण्याकरीता वरळी (मुंबई) येथील सागरी किनारी मार्ग (कोस्टल रोड) प्रकल्पाचे काम सुरु असल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर सागरी किनारी प्रकल्पाच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे, सदर प्रकल्प किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे, सदर प्रकल्पावर अद्यापपर्यंत किती खर्च करण्यात आला आहे,
(३) असल्यास, सदरहू प्रकल्पाच्या कामांबाबत स्थानिक मच्छीमार संघटनेने बदल सूचविले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वरळी (मुंबई) येथील सागरी मार्गाचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) कोस्टल रोड प्रकल्पाचे काम माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये सुरु झाले आहे.
(२) सदर प्रकल्पाचे ७०% काम पूर्ण झाले असून, सद्य:स्थितीत प्रकल्पाच्या पूर्णत्वाचा कालावधी माहे नोव्हेंबर, २०२३ असा आहे. तसेच, सदर प्रकल्पावर अद्यापपर्यंत रुपये ७२३३.९० कोटी इतका खर्च झालेला आहे.
(३) व (४) वरळी कोळीवाड्याजवळून मुंबई किनारी रस्ता पुलाच्या बांधकामाद्वारे वांद्रे-वरळी सागरी सेतूला जोडला जात आहे. सदर पुलाचे काम सुरु असून, स्थानिक कोळी बांधवांनी त्या पुलाच्या खांबांमधील अंतर वाढविण्याची मागणी केली होती. सदर मागणीस अनुसरुन नियुक्त करण्यात आलेल्या सात सदस्यीय समितीच्या अहवालानुसार दोन खांबांमधील अंतर ६० वरुन १२० मीटर इतके करण्याचे प्रस्तावित केले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ओझर (ता.निफाड, जि.नाशिक) नगरपरिषदेमार्फत शहरातील कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याबाबत

**(३२) * १८१३६ श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ओझर (ता.निफाड, जि.नाशिक) शहरातून जमा होणाऱ्या कचऱ्यावर ओझर नगरपरिषद प्रशासनामार्फत कोणतीही प्रक्रिया न करता रात्रीच्यावेळी जाळण्यात येवून तेथील बाणगंगा नदीत टाकण्यात येत असल्याने सदर कचऱ्याच्या उग्र, कुबट व दुर्गंधीयुक्त वातावरणामुळे स्थानिक नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याचे दिनांक १ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याठिकाणी असलेल्या अंगणवाडीतील शिक्षकांना तोंडाला रुमाल बांधून शिकवावे लागत असून विद्यार्थ्यांनाही तोंडाला रुमाल बांधून शिक्षण घ्यावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहरात जमा होणाऱ्या कचऱ्याची योग्यप्रकारे विल्हेवाट लावण्याकरीता नगरपरिषदेमार्फत एच.ए.एल.च्या सी.एस.आर. फंडातून पाच टन बायोगॅस प्रकल्प उभारण्यात आला असून मुख्याधिकारी, ओझर नगरपरिषद यांच्या दुर्लक्षामुळे सदर प्रकल्प अनेक वर्षांपासून विनावापर बंद असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ओझर शहरात जमा होणारा कचरा शहरापासून लांबच्या ठिकाणी टाकण्यात यावा तसेच बंद स्थितीत असलेला बायोगॅस प्रकल्प कार्यान्वित करण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी नगरपरिषद प्रशासन व शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ओझर शहरात जमा होणारा कचरा शहराबाहेर लांबच्या ठिकाणी टाकण्याबाबत तसेच कचऱ्याची योग्यप्रकारे विल्हेवाट लावण्याकरीता बंद असलेला बायोगॅस प्रकल्प कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे नाही.

ओझर शहरातील गट क्र.११०५ लगतच्या पडीक जागेवर शहरातून जमा होणाऱ्या कचऱ्याला अज्ञात व्यक्तीद्वारे आग लावण्यात आली होती. तथापि, नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यामार्फत आग विझवण्यात आली असून, अज्ञात व्यक्तीविरुध्द ओझर पोलीस स्टेशन येथे दिनांक १२ नोव्हेंबर, २०२२ रोजी तक्रार दाखल केली आहे. तसेच अशा घटनांची पुनरावृत्ती होवू नये याकरीता ३ पाळीत नगरपरिषद कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे.

सदर ठिकाणाजवळ असलेली सरकारवाडा अंगणवाडी सन २०१३ पासून सुरु असून, तेथून सदर प्रकल्पाबाबत कुठल्याही प्रकरची तक्रार प्राप्त नाही.

(३) हे खरे नाही.

ओझर शहरात जमा होणाऱ्या कचऱ्याची योग्यप्रकारे विल्हेवाट लावण्याकरीता ग्रामपंचायत काळात हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेड, नाशिक या कंपनीच्या सी.एस.आर. फंडातून बायोगॅस प्रकल्प उभारण्यात आला आहे. सदर बायोगॅस प्रकल्पामध्ये ओल्या कचऱ्यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया केली जाते. सद्य:स्थितीत सदर प्रकल्प व्यवस्थितरित्या सुरु आहे.

(४) हे खरे नाही.

सदर बायोगॅस प्रकल्प व्यवस्थितरित्या कार्यान्वित असून, सदर प्रकल्प बंद असल्याबाबत कुठलीही तक्रार नगरपरिषदेस प्राप्त नाही.

(५) ओझर शहरातील घनकचरा व्यवस्थापनासाठी पुरेशी जागा उपलब्ध होण्याकरीता ग्रामपंचायत कालीन साचलेल्या कचऱ्यावर बायोमायनिंग प्रक्रिया होणे आवश्यक असल्याने, सदर काम सी.एस.आर. फंडातून करुन देण्याबाबत हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेड, नाशिक या कंपनीला नगरपरिषदेने विनंती केली आहे.

हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेड, नाशिक यांना त्यांच्या क्षेत्रातील पडीक जागा घनकचरा व्यवस्थापनासाठी उपलब्ध करुन देण्याबाबत नगरपरिषदेने विनंती केली आहे. तसेच घनकचरा व्यवस्थापनासाठी पर्यायी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत जिल्हाधिकारी, नाशिक यांच्यास्तरावर कार्यवाही सुरु आहे.

सदर बायोगॅस प्रकल्प बंद नसून व्यवस्थितरित्या कार्यान्वित आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमध्ये सी.सी.टि.व्ही. यंत्रणा कार्यान्वित करण्याबाबत

**(३३) * १८१३७ श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी शाळेमध्ये सी.सी.टि.व्ही. बसविणे माहे जून, २०२२ पासून सक्तीचे करण्यात आले असूनही बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमध्ये आठ महिन्यांचा कालावधी होऊनही सी.सी.टि.व्ही. यंत्रणा बसविण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिकेच्या शाळेतील १३ वर्षीय विद्यार्थिंनीवर झालेल्या अत्याचाराच्या घटनेनंतर विद्यार्थीनींच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमध्ये सी.सी.टि.व्ही. यंत्रणा कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध शाळांमध्ये सी.सी.टि.व्ही. यंत्रणा कार्यान्वित करण्याकरीता प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असून, ई-निविदा प्रक्रियेची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच सदर शाळांमध्ये सी.सी.टि.व्ही. सर्वेक्षण व ई-निविदेच्या तांत्रिक कामाकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नेमणूक करण्यात आली असून, त्यांचेमार्फत सर्वेक्षणाचे काम सुरु आहे. सदर सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर सी.सी.टि.व्ही. बसविण्याची कार्यवाही त्वरीत पूर्ण करण्यात येणार आहे.

आर.एच.के. एज्युकेशनल ट्रस्ट या संस्थेमार्फत पीपीसी पॉलिसी अंतर्गत मान्यता देण्यात आलेल्या उंदेरिया उर्दू महानगरपालिका शाळेतील मुख्याध्यापकाने शाळेतील विद्यार्थीनीसोबत केलेल्या गैरवर्तणूकीप्रकरणी नागपाडा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ९९/२०२३ अन्वये कलम ३७६(२)(एफ), ३७३(३), ३५४, ५०६ भा.द.वि. सह कलम ४,८,१२ लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर शाळेत घडलेल्या घटनेनंतर आर.एच.के. एज्युकेशनल ट्रस्ट या संस्थेकडून उंदेरिया एमपीएस शाळेची मान्यता तात्काळ रद्द करण्यात आली आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कर्जत (जि.अहमदनगर) नगरपंचायत मधील गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(३४) * १८१४७ प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.अहमदनगर) नगरपंचायत मधील गैरकारभारावर आळा घालून गैरव्यवहाराची विभागीय चौकशी करुन दंडात्मक कारवाई करण्याबाबतचे निवेदन मा.मुख्यमंत्री यांना दिनांक ७ सप्टेंबर, २०२२ रोजी विठ्ठल वसंत सोनमाळी (ता.कर्जत, जि.अहमदनगर) यांनी दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत उपविभागीय अधिकारी, कर्जत-जामखेड विभाग, कर्जत यांना जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांच्या दिनांक ०३/११/२०२२ रोजीच्या आदेशान्वये सूचित केल्यानुसार उपविभागीय अधिकारी, कर्जत-जामखेड विभाग, कर्जत यांनी जिल्हाधिकारी, अहमदनगर यांच्याकडे दिनांक ०९/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेल्या अहवालाची तपासणी करुन, त्यातील १५ मुद्यांपैकी ११ मुद्दे निकाली काढण्यात आले आहेत. उर्वरित मुद्यांकरीता जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी त्यांच्या दिनांक ०९/०२/२०२३ रोजीच्या आदेशान्वये तांत्रिक ज्ञान असलेल्या अधिकारी यांची मुख्याधिकारी, शेवगाव नगरपरिषद यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन करण्यात आली असून, चौकशीची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या भायखळा येथील वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान व प्राणीसंग्रहालय उद्यानाच्या जागेवरील आरक्षणाबाबत

**(३५) * १८१६२ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या भायखळा येथील वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान व प्राणीसंग्रहालयाच्या उद्यानातील १३७३.७५ चौ.मीटर जागेवरील आरक्षण बदलून त्याजागी "रहिवासी वापर" असे आरक्षण दिनांक १८ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास प्रस्तावित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे सदरहू उद्यानाच्या जागेवर इमारती उभ्या राहून पक्षी उद्यानाचा विस्तार खंडीत होणार असल्यामुळे सदरहू जागेवरील आरक्षण बदलण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेने नागरिकांकडून मागविलेल्या हरकती व सूचनांनुसार नागरिकांनी सदरहू जागेवरील आरक्षण बदलण्यात येऊ नये याकरीता हरकती नोंदविल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान व प्राणीसंग्रहालय उद्यानाच्या जागेवरील आरक्षण कायम ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ‘ई’ प्रभागातील माता जिजाबाई भोसले उद्यान व प्राणीसंग्रहालय हे न.भू.क्र.५६३, ५९३, ५९२, १/५९२, २/५९२, ३/५९२ व ५८७ वर स्थित आहे. विकास आराखडा-२०३४ मध्ये सदर भूभागावर उद्यान/बगीचा (EOS१.५) + प्राणीसंग्रहालय (EOS२.३) व वनस्पती उद्यान (EOS२.८) हे नामनिर्देशन दर्शविण्यात आले असून सदर आराखड्यामध्ये ‘वीर माता जिजाबाई भोसले उद्यान व प्राणीसंग्रहालय’ असे चिन्हांकित करण्यात आले आहे. न.भू.क्र.५९० हा वीर माता जिजाबाई भोसले उद्यान व प्राणीसंग्रहालय लगतच्या भूभागावर स्थित आहे.

सि.एस.क्र.५९०, माझगाव डिव्हीजन या भूखंडावर सुमारे सन १९३४ पासून इमारत अस्तित्वात असल्याने जागेवरील वस्तुस्थिती विचारात घेता सदर भूखंडावर दर्शविण्यात आलेले नामनिर्देशन ही आरेखनातील त्रुटी असल्याने सदर भूखंडावरील उद्यान/बगीचा (EOS१.५) + झू (DOS२.३) चे नामनिर्देशन रद्द करून सदर भूखंड रहिवास वापर विभागात समाविष्ट करणेबाबत विकास योजनेमध्ये फेरबदल करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम-१९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदलाची वैधानिक कार्यवाही करून फेरबदलाचा प्रस्ताव शासनास सादर करणेबाबत दिनांक १६/११/२०२२ रोजीचे पत्राद्वारे महापालिकेस कळविण्यात आले आहे. त्यानुसार महापालिकेने सदरहू प्रस्तावित फ़ेरबदलाची कलम ३७(१) अन्वये सूचना दिनांक १९/०१/२०२३ रोजी प्रसिध्द केली असून त्याद्वारे प्रस्तावित फेरबदलावर जनतेच्या सूचना/हरकती मागविण्यात आल्या आहेत.

(२) सदर भूखंडावर विकास योजना-२०३४ नुसार उद्यान व प्राणीसंग्रहालयाचे नामनिर्देशन दर्शविण्यात आले असले तरी सदर भूभागावर सन १९३४ पासून इमारत अस्तित्वात असून, सदर भूखंडाचे अत्यल्प क्षेत्रफळ व सदर भूखंडावर Earlier Draft DP-२०१५ नुसार सुद्धा आरक्षण/नामनिर्देशन दर्शविण्यात आलेले नसणे, लगतचे सी.एस.क्र.५८९ व ५९०/१ हे भूखंड रहिवास विभागात दर्शविलेले असणे इ. बाबी विचारात घेता, सदर भूखंडावर दर्शविण्यात आलेले नामनिर्देशन ही आरेखनातील त्रुटी असल्याने विकास योजनेत उक्त अधिनियमाचे कलम ३७ (१) अन्वये सदर फेरबदल कार्यान्वित करणेबाबत महापालिकेस कळविण्यात आले आहे.

सदर भूखंड अस्तित्वातील उद्यानाचा भाग नसून सदर भूखंडाचे क्षेत्रफळ अत्यल्प असून त्यावर सन १९३४ पासून इमारत अस्तित्वात आहे. त्यामुळे, सदर प्रस्तावित फेरबदल प्रस्तावामुळे उद्यानाच्या विस्तारावर निर्बंध येतील अशी बाब नाही.

(३) सदर प्रस्तावित फेरबदलाबाबत महापालिकेकडे दिनांक १०/०२/२०२३ पर्यंत २ सूचना/हरकती प्राप्त झाल्या आहेत. सूचना/हरकती दाखल करण्याची विहित मुदत दिनांक १८/०२/२०२३ पर्यंत आहे. त्यानुसार सदर फेरबदलाच्या अनुषंगाने महापालिकेस विहित मुदतीत प्राप्त होणाऱ्या हरकती/सुचनांवर अधिनियमातील तरतुदीनुसार महापालिकेकडे सुनावणी देण्यात येणार आहे.

(४) महापालिकेने सदर प्रस्तावित फेरबदलाचे अनुषंगाने उक्त अधिनियमातील कलम ३७ मधील तरतुदीनुसार वैधानिक कार्यवाही पार पाडून त्यानुसार विहित मुदतीत प्राप्त होणाऱ्या जनतेच्या सूचना/हरकती विचारात घेऊन त्यानुसार सदर फेरबदल प्रस्ताव शासनाचे कलम ३७ (२) अन्वये मंजूरीसाठी सादर केल्यावर, त्यानुषंगाने संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य यांचेशी सल्लामसलत केल्यानंतरच गुणवत्तेनुसार सदर फेरबदल प्रस्तावास शासन स्तरावर अंतिम निर्णय घेण्यात येईल.

(५) लागू नाही.

-----------------

## सिरोंचा (जि.गडचिरोली) तालुक्यातील ग्रामीण भागात राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या नियमित बस फेऱ्या सुरु करण्याबाबत

**(३६) * १८०३६ श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रवीण दटके, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रविण पोटे-पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिरोंचा (जि.गडचिरोली) तालुक्यातील राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बस फेऱ्या अनिश्चित वेळेत व कमी असल्यामुळे ग्रामीण व अतिदुर्गम भागातील प्रवाशांची गैरसोय होत असल्याचे दिनांक २४ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सिरोंचा तालुक्यातील ग्रामीण भागात नियमित बस फेऱ्या सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अहेरी ते सिरोंचा हा मार्ग सद्य:स्थितीत खराब असल्याने चालनातील बसेस वारंवार मार्गस्थ बिघाड होत असल्याने बसफेऱ्या या वेळेत पोहचण्यात अडथळा निर्माण होत आहे.

(२) व (३) सदर रस्त्याच्या दुरुस्तीबाबत जिल्हाधिकारी, गडचिरोली, कार्यकारी अभियंता, गडचिरोली, राष्ट्रीय महामार्ग विभाग, गडचिरोली, अधीक्षक अभियंता, नागपूर, अधीक्षक अभियंता, सा.बां. गडचिरोली, उपविभागिय अधिकारी, महामार्ग उपविभाग, आलापल्ली, जि.गडचिरोली यांचेशी विभाग नियंत्रक गडचिरोली यांचेमार्फत पत्र देऊन पाठपुरावा करण्यात येत आहे.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेने जाहीर केलेल्या पदपथविषयक धोरणाची अंमलबजावणी करण्याबाबत

**(३७) * १७४७३ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने पादचाऱ्यांची सुरक्षितता लक्षात घेत सन २०१६ मध्ये पदपथविषयक धोरण आखले असून ३ वर्षांचा कालावधी होऊनही सदर धोरणातील मार्गदर्शक तत्वानुसार एकही बदल पदपथावर झाला नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अरुंद रस्ते, अपुरी पार्किंग व्यवस्था, पदपथांची आणि पादचारी रस्त्यांची चुकीची रचना यामुळे पदपथ धोरणाची अंमलबजावणी झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईतील पदपथावरील अतिवर्दळामुळे होणारी झीज व फरशा तुटणे, पावसाळयात शेवाळामुळे फरश्या गुळगुळीत होत असल्यामुळे पदपथावर फरश्याऐवजी पेव्हरब्लॉक बसविण्यात येणे तसेच पेव्हरब्लॉकच्या त्रुटीमुळे पदपथ असमतोल होऊन पदपथांवर खड्डे पडल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पदपथांवर बसणाऱ्या फेरीवाल्यांचा त्रास पादचाऱ्यांना सहन करावा लागत असून खाद्यपदार्थांची विक्री करणाऱ्या हातगाड्या स्टॉल्सनीही पदपथांवरच अतिक्रमण केले तसेच काही पदपथांवर झोपड्या उभ्या राहिल्या असल्याने मुंबईतील पदपथ पादचाऱ्यांसाठी असुरक्षित बनले आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेने सन २०१६ मध्ये जाहीर केलेल्या पदपथ विषयक धोरणाप्रमाणे पादचाऱ्यांना सुरक्षित पदपाथावरुन चालणे सुलभ होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दिनांक २८/१२/२०१६ रोजीच्या पादचारी प्रथम-पदपथ या धोरणामध्ये पदपथांची रुंदी, पृष्ठभाग, उपयोगिता सेवांची रचना, पादचारी झोन, फर्निचर झोन, पदपथांची उंची, गाडरेल इत्यादी मार्गदर्शक तत्वांचा अंतर्भाव असून, सदर धोरणानंतर नुतनीकरण करण्यात आलेल्या रस्त्यांच्या रुंदीनुसार पदपथांवर अंमलबजावणी करण्यात आलेली आहे.

याव्यतिरिक्त खड्डेमुक्त पदपथ निर्माण करण्यासाठी दिनांक ०२/०२/२०१९ रोजीच्या पदपथ सुधारणेबाबतच्या धोरणानुसार, पदपथाच्या रुंदीनुसार पेव्हर ब्लॉकऐवजी सिमेंट काँक्रिट, स्टेनसील काँक्रिटचा वापर करुन पदपथांची सुधारणा करण्यात आलेली आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दिनांक २८/१२/२०१६ रोजीच्या पादचारी प्रथम-पदपथ या धोरणानुसार, नमूद केलेल्या निर्देशांचे रस्त्यांच्या पदपथ दुरुस्ती तसेच नुतनीकरणादरम्यान पालन केले जाते. अरुंद रस्त्यांविषयी मागणी प्राप्त झाल्यानंतर रस्तारेषा निश्चित करण्याची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रस्ते विभागामार्फत करण्यात येते. तसेच सदर रस्तारेषामध्ये बाधित झालेल्या बांधकामांवर निष्कासनाची कार्यवाही केल्यानंतर सदर अरुंद रस्त्यांचे विस्तारीकरण कंत्राटदार नेमून करण्यात येते.

तसेच विकास नियोजन आराखड्यात दर्शविल्याप्रमाणे रस्त्यांचे बांधकाम करण्यात येते. सदर विस्तारीकरण दरम्यान व कोणत्याही रस्त्यांच्या दुरुस्ती दरम्यान पदपथ धोरणाचे काटेकोरपणे पालन करण्यात येते.

मुंबईतील वाहतूक समस्या निराकरण करण्याच्या दृष्टीकोनातून बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यात एकूण ३२ वाहनतळ असून, सदर वाहनतळांची एकूण क्षमता २७,३९५ इतकी आहे. त्यापैकी कंत्राटदारांची नियुक्ती करुन ३१ वाहनतळे जनतेसाठी खुली करण्यात आली आहेत. उर्वरित १ वाहनतळाकरीता निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. तसेच ९१ ठिकाणी रस्त्यावरील वाहनतळे असून, सद्य:स्थितीत ६९ ठिकाणी वाहनतळे कार्यान्वित आहेत व २२ ठिकाणची वाहनतळे ही विविध पायाभूत सुविधांच्या कामांमुळे तात्पुरत्या स्वरुपात बंद ठेवण्यात आली आहेत.

विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ मधील तरतूद नियम क्र. ५३ मध्ये भूमिगत वाहनतळ (अंडरग्राऊंड पार्किंग) बनविण्याबाबत सुचविण्यात आले आहे. तसेच महानगरपालिका हद्दीतील विविध विभागांमध्ये उद्याने, खेळाची मैदाने व सार्वजनिक खुल्या जागा यांमध्ये भूमिगत वाहनतळे अंतर्भूत करण्यात आली आहेत.

मुंबादेवी येथे ५४६ व माटुंगा मध्य रेल्वे स्थानकाजवळ ४७५ रोबोटिक पार्किंगबाबत कार्यादेश देण्यात आले आहेत. तसेच, प्रस्तावित असलेल्या ३ बहुस्तरीय यांत्रिकी वाहनतळांन्वये जवळपास ९४८ पार्किंग जागा उपलब्ध होणार आहे.

तसेच, विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ मधील अधिनियम ५१ अन्वये, मुंबई वाहनतळ प्राधिकरणाची स्थापना करण्यात येणार असून, त्याकरीता मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलमांमध्ये सुधारणा प्रस्तावित करण्यात येणार आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) पावसाळयात शेवाळयामुळे फरश्या गुळगुळीत होणे, फरश्या तुटणे व पदपथ असमतोल होणे हे टाळण्याकरीता माहे फेब्रुवारी, २०१९ पासून नवीन पदपथ बनवितांना किंवा जुने दुरुस्त करतांना आत पेव्हर ब्लॉक / फरश्यांऐवजी स्टॅम्पड सिमेंट काँक्रिटचा वापर केला जात आहे.

(४) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते व पदपथावर अनधिकृतपणे विक्री / व्यवसाय करणाऱ्या पथविक्रेत्यांच्या अतिक्रमणाविरुध्द बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत नियमितपणे कारवाई करण्यात येते.

माहे जानेवारी, २०२२ ते डिसेंबर, २०२२ या कालावधीत एकूण १,७५,९८० अनधिकृत पथविक्रेत्यांच्या अतिक्रमणाविरुध्द निष्कासनाची कारवाई करण्यात आली असून, सदर कारवाईत एकूण रुपये २.५० कोटी इतका विमोचन आकार महसूल वसूल करण्यात आला आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) हे खरे नाही.

सन २०१६ मध्ये जाहीर केलेल्या पदपथ विषयक धोरणानुसार नवीन पदपथांची सुधारणा करण्यात आलेली आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भोकर (जि.नांदेड) नगरपरिषदे अंतर्गत गैरव्यवहार प्रकरणातील दोषी तत्कालिन मुख्याधिकारी यांची पदोन्नती रद्द करण्याबाबत

**(३८) * १७२८७ श्री.सुरेश धस : तारांकित प्रश्न क्रमांक १५५१७ ला दिनांक २८ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोकर (जि.नांदेड) नगरपरिषद अंतर्गत खोटी कागदपत्रे तयार करुन लाखो रुपयांचा अपहार केल्याप्रकरणी ४८ तासांपेक्षा अधिक काळ अटकेत राहिल्याने तत्कालिन मुख्याधिकारी यांना पुर्वलक्षी प्रभावाने दिनांक २७ नोव्हेंबर, २०१९ पासून निलंबित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २७ नोव्हेंबर, २०१९ पासून निलंबित असल्याने तत्कालिन मुख्याधिकारी यांना दिनांक १८ जानेवारी, २०२१ रोजी गट-ब मधून गट-अ मध्ये देण्यात आलेली पदोन्नती व वेतनश्रेणी अवैध ठरत असतानाही सदरहू पदोन्नती व वेतनश्रेणी अद्याप काढून घेतली नसल्याचे तसेच पूर्णवेळ म्हणून व अवैध पदोन्नतीने अदा केलेले वेतन व भत्तेही शासनाने वसुल केले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९८० च्या नियम ४ च्या पोट नियम (२) च्या खंड (अ) नुसार फौजदारी आरोपाखाली किंवा अन्यथा अटक करुन ४८ तासांहून अधिक काळ शासकीय कर्मचाऱ्याला पोलीस किंवा न्यायालयीन अभिरक्षेमध्ये ठेवले असेल तर त्या कर्मचाऱ्यांस अटकेत ठेवल्याच्या दिनांकापासून निलंबनाधीन ठेवल्याचे मानण्यात येते, तसेच सदरहू जबाबदार अधिकारी असल्याने त्यांनी स्वत: याबाबतची माहिती शासनास देणे बंधनकारक असतानाही खोटी माहिती देऊन पदोन्नती मिळवून शासनाची दिशाभूल व फसवणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू तत्कालिन मुख्याधिकारी, भोकर नगरपरिषद यांची पदोन्नती रद्द करुन त्यांना अदा करण्यात आलेले वेतन व भत्ते वसूल करण्याबाबत कार्यवाही करुन तत्कालिन मुख्याधिकारी यांना सहकार्य करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय.
(२), (३) व (४) भोकर, जि.नांदेड नगरपरिषदे अंतर्गत झालेल्या गैरव्यवहार प्रकरणी संबंधित अधिकारी हे ४८ तासांपेक्षा जास्त कालावधीसाठी पोलीस कोठडीत असल्याचे निदर्शनास आल्याने शासन आदेश दिनांक २१/१२/२०२२ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम ४(२) अ मधील तरतूदींनुसार त्यांना अटकेच्या दिनांकापासून निलंबित करण्यात आले आहे.

यावर झालेल्या अनियमिततेबाबत संबंधित अधिकाऱ्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित आहे. संबंधित अधिकाऱ्याची पदोन्नती रद्द करण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाशी विचारविनिमय करण्यात येत असून, त्यांच्या अभिप्रायांनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अनुसूचित जाती/जमातीच्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीसाठी वार्षिक उत्पन्नाची मर्यादा वाढविण्याबाबत

**(३९)** * **१७७०५ श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनुसूचित जाती/जमातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळविण्यासाठी रुपये अडीच लाख वार्षिक उत्पन्न मर्यादा असून अत्यल्प उत्पन्न मर्यादेमुळे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीच्या लाभापासून वंचित रहावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्य शासनाने निर्णय घेऊन तसेच केंद्र शासनाकडे पाठपुरावा करुन विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीसाठी वार्षिक उत्पन्न मर्यादा रुपये आठ लाख करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील निराधार व दिव्यांगांना देण्यात येणाऱ्या अर्थसहाय्याच्या रकमेत वाढ करण्याबाबत

**(४०) * १७८८४ श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिकेत तटकरे, श्री.राजहंस सिंह : तारांकित प्रश्न क्रमांक १२५५२ ला दिनांक ३ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनामार्फत समाजातील निराधार पुरुष व महिला, दारिद्र्य रेषेखालील महिला, अनाथ मुले, अंध, अपंगांतील सर्व प्रवर्ग, गंभीर आजारामुळे स्वत:चा चरितार्थ चालवू न शकणारे पुरुष व महिला, निराधार विधवा, घटस्फोट झालेल्या, पोटगी न मिळालेल्या, वेश्या व्यवसायातून मुक्त महिला, तृतीयपंथी, देवदासी, अविवाहित स्त्री, शिक्षा भोगत असलेल्या कैद्यांची पत्नी, सिकलसेलग्रस्त या सर्वांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना शासनाकडून दरमहा रुपये १००० आणि दोन अपत्ये असलेल्या लाभार्थ्यांना दरमहा रुपये १२०० आर्थिक अर्थसहाय्य देण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्याच्या महागाईच्या काळात शासनाकडून मिळणारे रुपये १००० व रुपये १२०० चे अर्थसहाय्य अत्यंत तुटपुंजे/अपुरे असल्यामुळे एका व्यक्तीचा महिन्याचा खर्च भागविणे अडचणीचे होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील निराधार, अनाथ व दिव्यांगांना मिळणाऱ्या अर्थसहाय्याच्या रकमेत वाढ करण्याची मागणी लाभार्थ्यांनी शासनाकडे दिनांक १ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील निराधार, दारिद्र्य रेषेखालील महिला, अनाथ व दिव्यांगांना मिळणाऱ्या अर्थसहाय्याच्या रकमेत वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) विभागाच्या दिनांक २० ऑगस्ट, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थ्यांच्या अर्थसहाय्यात दरमहा रुपये ६००/- वरुन रुपये १०००/- तर १ अपत्य असलेल्या विधवा लभार्थ्यांना रुपये ११००/- व २ अपत्य असलेल्या विधवा लाभार्थ्यांना रुपये १२००/- इतकी वाढ करण्यात आली आहे. सदरहू योजनेतील लाभार्थ्यांच्या अर्थसहाय्यात वाढ करण्याचा अद्याप निर्णय झालेला नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर शहरातील दिव्यांगांना महानगरपालिकेकडून वाढीव भत्ता देण्याबाबत

**(४१) * १७८४७ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर शहरातील दिव्यांग बांधवांना महानगरपालिकेकडून रुपये एक हजार भत्ता देण्यात येत असून उक्त भत्त्याची रक्कम तुटपुंज्या स्वरुपाची असल्याने सदरहू भत्त्यांमध्ये वाढ करण्याबाबतची मागणी शहरातील दिव्यागांनी महानगरपालिकेकडे केली असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने राजस्थान व दिल्ली येथील दिव्यांगांना देण्यात येणाऱ्या भत्त्याप्रमाणे छत्रपती संभाजीनगर शहरातील दिव्यांगांना वाढीव भत्ता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) आयुक्त तथा प्रशासक, औरंगाबाद महानगरपालिका यांनी गठीत केलेल्या दिव्यांग कल्याण समितीने घेतलेल्या निर्णयानुसार महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांगांना वाढीव भत्ता देण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेली आहे.
त्यामुळे शासनाने या प्रकरणी चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परभणी महानगरपालिका हद्दीतील अतिक्रमणे निष्कासित करण्याबाबत

**(४२) * १७१७६ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी : दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ९ मधील प्रश्न क्रमांक ८७०५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी दिलेल्या सुचनेवरुन आयुक्त, परभणी महानगरपालिका यांनी सर्वेक्षण करुन परभणी शहरातील १३०५ अतिक्रमणाची यादी तयार केली असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक ९ डिसेंबर, २०२० च्या आदेशान्वये सुमोटो रिट याचिका क्र.९३४३२/२०२० मध्ये अतिक्रमणे व अनधिकृत बांधकामे दिनांक ३१ जानेवारी, २०२१ पर्यंत काढण्याबाबत स्थगिती दिली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील स्थगिती आदेश दिनांक ३१ जानेवारी, २०२१ पर्यंतच लागू असल्याने त्यानंतर अतिक्रमणे काढण्याची मोहिम न करता आयुक्त, परभणी महानगरपालिका यांचेकडून अतिक्रमणधारकांना सहकार्य करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने परभणी शहरातील १३०५ अतिक्रमणे काढणे तसेच पूर्वी काढण्यात आलेल्या २४० अतिक्रमणावर पुन्हा अतिक्रमण होणार नाहीत याबाबत आयुक्त, परभणी महानगरपालिका स्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

- परभणी शहर महानगरपालिका हद्दीमध्ये मान्सूनपूर्व तयारीच्या अनुषंगाने माहे मे-जून, २०२१ मध्ये प्रभाग समिती निहाय सर्वेक्षण करुन एकूण १३०५ अतिक्रमाणांची यादी तयार करण्यात आली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) मा.उच्च न्यायालयाचे आदेशातील मुदतीनंतर परभणी शहरामध्ये अतिक्रमण मोहिम राबविण्यात आलेली असून त्यामध्ये सुमारे २४० अतिक्रमणे निष्कासित करण्यात आलेली आहेत. त्यामुळे परभणी महानगरपालिकेकडून अतिक्रमण धारकांना सहकार्य करीत असल्याची वस्तुस्थिती नाही.

(४) निष्कासित करण्यात आलेली अतिक्रमणे पुन्हा होवू नयेत याकरीता संबंधित प्रभाग समिती अंतर्गत अभियंता आणि स्वच्छता निरीक्षक यांची दैनंदिन निगराणी सुरु करण्यात आलेली आहे.

- ज्या ठिकाणी पुन्हा अतिक्रमणे होतील त्या ठिकाणी आवश्यक पोलीस बंदोबस्तासह अतिक्रमणे निष्कासित करण्याबाबत संबंधित प्रभाग समितीच्या सहायक आयुक्त, अभियंते आणि स्वच्छता निरिक्षकांना आदेशित करण्यात आले आहे.
- उर्वरित अतिक्रमणे काढून टाकण्याची कार्यवाही प्रस्तावित असल्याचे आयुक्त, परभणी शहर महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील डिलाईल रोड बसथांब्यावरुन राज्य मार्ग परिवहन महामंडळाची बस वाहतूक पुर्ववत सुरु करण्याबाबत

**(४३) * १७२४० श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर आणि उपनगरातील प्रवाशांच्या सोयीसाठी डिलाईल रोड परिसरात राज्य मार्ग परिवहन महामंडळाने राजर्षी शाहू महाराज बस स्थानक सुरु केले असून सदर बस स्थानकावरील गाड्या महामंडळाने गत चार वर्षांपासून बंद केल्या असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अधिकृत बस स्थानकावर महामंडळाच्या बसेस बंद असल्याकारणाने सदर बस थांब्यावरुन खाजगी ट्रॅव्हल्स गाड्यांची सर्रासपणे वाहतूक सुरु असल्याने प्रवाशांमध्ये असंतोष निर्माण होत असून प्रवाशांना सदर ठिकाणाहून उभ्या असणाऱ्या खाजगी ट्रॅव्हल्सद्वारे प्रवास करुन आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबईतील डिलाईल रोड परिसरातील राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या राजर्षी शाहू महाराज बस स्थानकावरुन होणारी खाजगी वाहतूक बंद करुन राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बस सेवा सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) व (४) डिलाईल रोड बसथांब्याजवळ मोनो रेलच्या उड्डाणपुलाचे व लोअर परेल येथील रेल्वे क्रॉसिंगच्या पुलाचे काम चालु असल्याने सदर ठिकाणी वाहतूकीस अडथळा निर्माण होत आहे. त्यामुळे काही फेऱ्यांच्या मार्गात बदल करुन चालविण्यात येत आहेत. तसेच पुलाच्या कामामुळे काही फेऱ्या बंद करण्यात आल्या आहेत. डिलाईल रोडवरील थांब्याचे व मार्गाचे सर्वेक्षण करण्यात येत असून लवकरच सदर थांब्यावरुन वाहतूक पुर्ववत सुरू करण्यात येणार आहे. तसेच अवैध खाजगी वाहतूक बंद करण्याबाबत परिवहन आयुक्त, मुंबई व सह पोलीस आयुक्त वाहतूक, मुंबई यांना कळविण्याच्या सूचना राज्य परिवहन महामंडळास देण्यात आल्या आहेत.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधी व उपदानाकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४४) * १६९५० श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळास शासनाकडून गत ५ महिन्यांपासून अपुरा निधी मिळत असल्यामुळे राज्य मार्ग परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात केलेला रकमेचा हिस्सा रुपये ६५० कोटी भविष्य निर्वाह निधी व उपदान या दोन्ही ट्रस्टकडे जमा झाले नसल्याचे दिनांक २ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य मार्ग परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधी व उपदानाच्या रक्कमा ट्रस्टकडे भरण्यात आले नसल्याकारणामुळे सदरहू ट्रस्टला त्यापोटी मिळणारे व्याज रुपये १२ ते १५ कोटी मिळाले नसून ट्रस्ट अडचणीत आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सेवेतून मागील दोन वर्षात सेवानिवृत्त झालेल्या ९९०४ कर्मचाऱ्यांची रुपये १७५ कोटी इतकी थकबाकी प्रलंबित असून त्यापैकी किती थकबाकीची रक्कम अद्यापपर्यंत कर्मचाऱ्यांना अदा करण्यात आली आहे, तसेच अप्पर केंद्रीय भविष्य निर्वाह निधी भवन बांद्रा, मुंबई यांचे कार्यालयात ऑफलाईन दावे स्वीकारण्यात आलेल्या राज्य मार्ग परिवहन महामंडळातील किती निवृत्त कर्मचाऱ्यांना कुटुंब निवृत्तीवेतनाचा लाभ देण्यात आला आहे व किती प्रकरणे प्रलंबित आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्य मार्ग परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या भविष्य निवार्ह निधी व उपदानाच्या रक्कमा भरण्याबाबत तसेच निधीची तरतूद करुन राज्य मार्ग परिवहन महामंडळास पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) सदर रकमा ट्रस्टकडे भरण्यास विलंब होत असला तरी कर्मचाऱ्यांना मात्र त्यांच्या कपातीवर पूर्ण व्याज देण्यात येत आहे. सदर व्याजाची प्रतिपूर्ती रा.प. महामंडळाकडून करण्यात येत आहे.

(३), (४) व (५) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामधून मागील दोन वर्षात ७९३७ कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत. सेवानिवृत्त कर्मचारी यांची माहे डिसेंबर २०२२ अखेर रजा रोखीकरण रुपये १२२.८४ कोटी तसेच कामगार करार थकीत रक्कम रुपये २५.५७ कोटी अशी एकूण रुपये १४८.४१ कोटी रक्कम प्रलंबित आहे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना मागील २ वर्षांत रजा रोखीकरणापोटी रुपये ५२.११ कोटी तसेच कामगार करार थकीत रक्कमेपोटी रुपये ५९.०३ कोटी अशी एकूण रुपये १११.१४ कोटी इतकी रक्कम अदा करण्यात आली आहे.

अप्पर केंद्रीय भविष्य निर्वाह निधी भवन वांद्रे, मुंबई येथे रा.प. महामंडळातील सन २०१७ ते २०२३ पर्यंत एकूण १०६३ दावे सादर करण्यात आलेले असून त्यापैकी ३६६ सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना ऑफलाईन पध्दतीने कुटुंब निवृत्ती वेतनाचा लाभ देयकरण्यात आलेला आहे. तसेच ४०८ दावे भविष्य निर्वाह निधी कार्यालय वांद्रे येथे प्रलंबित आहेत. तथापि, ९८ कर्मचाऱ्यांचे दावे ऑनलाईन पध्दतीने सादर करुन निकाली काढण्यात आलेले आहेत व इतर १९१ कर्मचाऱ्यांच्या दाव्यांबाबत विभागीय स्तरावर कार्यवाही प्रगत आहे.

-----------------

## मौ.वरुड (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) परिसरातील नदीचे पाणी प्रदूषित झाल्याबाबत

**(४५) * १७६९५ डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.चौरंबा (ता.अर्धापूर, जि.नांदेड) हद्दीमध्ये असलेल्या गणेश स्टोन क्रेशर मशीनचे रेती धुतलेले पाणी मौ.वरुड (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) या हद्दीतून वाहत असलेल्या नदीमध्ये गत एक वर्षापासून सोडल्यामुळे नदीमध्ये ५ फूट गाळ जमा झाल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू नदीमधील प्रदूषित पाण्यामुळे शेती पिकांवर व जनावरांच्या आरोग्यावर परिणाम होऊन जनावरांचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्रदूषित सांडपाणी नदीमध्ये सोडणाऱ्या संबंधित कंपनीवर कारवाई करुन नदीपात्र स्वच्छ ठेवण्याबाबत तसेच नदी पात्रातील गाळ काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) याबाबतचे निवेदन तालुका कृषी अधिकारी, कळमनुरी, जि.हिंगोली तसेच पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांच्याकडे प्राप्त झाले नसल्याचे संबंधित कार्यालयाने कळविले आहे.

(३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर उद्योगाच्या केलेल्या पाहणी दरम्यान मे.गणेश स्टोन क्रशर, मौ.चौरंबा, ता.अर्धापुर, जि.नांदेड या उद्योगाने संमतीपत्रातील अटी व शर्तीचे उल्लघन केल्याचे आढळून आल्याने सदर उद्योगास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिनांक २१/०२/२०२३ रोजी प्रस्तावित निर्देश बजावले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेत कार्यरत अर्धवेळ शिक्षकांच्या मागण्या पूर्ण करण्याबाबत

**(४६) * १८०६० श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागाच्या छोटा व मोठा शिशू (के.जी.) वर्गावर १५ वर्षापासून अर्धवेळ कार्यरत शिक्षकांना महानगरपालिका शिक्षकांप्रमाणे पूर्णवेळ सेवेत समावून घ्यावे आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक शाळेमध्ये (पब्लिक स्कूलमध्ये) रुजू करण्याबाबतची मागणी महानगरपालिका शिक्षक संघटना अनेक वर्षापासून शासनाकडे करीत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अर्धवेळ शिक्षकांच्या मागण्या पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुंबई पब्लिक स्कूल छोटा शिशू व मोठा शिशू वर्गावर कार्यरत असलेल्या अर्धवेळ/अंशकालीन शिक्षकांची नेमणूक ही कंत्राटी असून पूर्णपणे तात्पुरत्या स्वरुपाची प्रति महिना रुपये ५०००/- ठोक वेतनावर असेल, सन २००७-०८ मध्ये मुंबई पब्लिक स्कूल माध्यम सुरु करण्यात आले असल्याने इयत्ता १ ली करीता नियुक्त प्रशिक्षित शिक्षकांचे नियमन बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या (सेवा) नियम १९८९ चे नियम आणि सेवा संचलन सहित बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा (संचालन) नियम १९९९ च्या सेवा शर्ती आणि नियम अन्वये होईल, तसेच छोटा शिशू (ज्युनिअर के.जी.) व मोठा शिशू (सिनिअर के.जी.) करीता पार्ट टाईम शिक्षकांचे नियमन या नियमानुसार होणार नाही असे जाहिरातीत स्पष्ट नमूद करण्यात आले होते.

तथापि, अर्धवेळ/अंशकालीन शिक्षकांची पदे शिक्षण विभागाच्या आस्थापना अनुसूचीवर नसल्याने व हमीपत्रात सदर अर्धवेळ/अंशकालीन शिक्षकांनी अटी व शर्ती मान्य केलेल्या असल्याने त्यांना महानगरपालिका शिक्षकांप्रमाणे सेवेत कायम करणे शक्य नाही.

सद्य:स्थितीत मुंबई पब्लिक स्कूल वर्गावर कार्यरत असलेल्या छोटा व मोठा शिशू अंशकालीन शिक्षकांचे मानधन रुपये ८०००/- इतके करण्याकरीता प्रस्ताविण्यात आले आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वसई-विरार महानगरपालिकेने बांधलेल्या बहुउद्देशीय इमारतीच्या जागेत शासकीय प्राथमिक आरोग्य केंद्र/आरोग्य रुग्णालय सुरु करणेबाबत

**(४७) * १७०७३ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रातील मौजे गोखिवरे फादरवाडी येथील अस्तित्वात असलेल्या शासकीय प्राथमिक आरोग्य केंद्राची जागा जमीनदोस्त करण्यात येऊन त्याठिकाणी नव्याने वसई-विरार महानगरपालिकेच्या बहुउद्देशीय इमारतीचे बांधकाम सुरु असल्याचे दिनांक १२ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मौजे गोखिवरे येथील वसई-विरार शहर महानगरपालिकेने नव्याने बांधलेल्या बहुउद्देशीय इमारतीच्या जागेत सर्व सामान्य नागरिकांसाठी शासकीय प्राथमिक आरोग्य केंद्र अथवा आरोग्य रुग्णालय सुरु करणेबाबत स्थानिक नागरिकांनी व लोकप्रतिनिधींनी आयुक्त, वसई-विरार महानगरपालिका तसेच शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वसई-विरार महानगरपालिकेने बांधलेल्या बहुउद्देशीय इमारतीच्या जागेत शासकीय प्राथमिक आरोग्य केंद्र किंवा आरोग्य रुग्णालय सुरु करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे गोखिवरे, फादरवाडी येथे भुतपूर्व ग्रामपंचायत काळापासून शासकीय प्राथमिक आरोग्य केंद्र अस्तित्वात होते.

तथापि, उक्त अस्तित्वातील जुने व अरुंद प्राथमिक आरोग्य केंद्र निष्कासित करुन त्याठिकाणी बहुउद्देशीय इमारत बांधून नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र प्रस्तावित करण्यात आले आहे. तसेच महानगरपालिकेमार्फत नव्याने बांधण्यात आलेल्या बहुउद्देशीय इमारतीच्या जागेत शासकीय प्राथमिक आरोग्य केंद्र सुरु करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मागणी केल्याची बाब वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविली आहे.

सद्य:स्थितीत जी+२ इमारतीचे बांधकाम करण्यात आले असून इमारतीचा पहिला व दुसरा मजला प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी प्रस्तावित आहे. तद्नुषंगाने प्राथमिक आरोग्य केंद्राची अंतर्गत रचना व इतर आवश्यक कामांचे अंदाजपत्रक तयार करण्याचे काम महानगरपालिकेच्या स्तरावर सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीमध्ये अनियमितता करणाऱ्या दोषी संस्थाचालकांवर कारवाई करण्याबाबत

**(४८)** * **१८०७५ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिक्षणासाठी दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्तीमध्ये सन २०१७ मध्ये झालेल्या गैरव्यवहारामध्ये दोषी असलेल्या शैक्षणिक संस्थावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी हिंदू विधिज्ञ परिषद यांनी मा.सामाजिक न्याय मंत्री यांच्याकडे सन २०२२ मध्ये करुनही दोषींवर कोणतीही कारवाई झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संस्थांच्या लेखापरिक्षणाच्या अनुषंगाने विश्लेषण व पडताळणी करुन ६४ शिक्षण संस्थांकडून रुपये ९६.१६ कोटी वसूल करण्याची कार्यवाही करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणाची विशेष पथकामार्फत करण्यात आलेल्या चौकशीचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून त्यानुषंगाने दोषी संस्थाचालकांवर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मागासवर्गीय विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्तीमध्ये अनियमितता करणाऱ्या दोषी संस्थाचालकांवर गुन्हे नोंद करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) अंशत: खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) होय, लेखापरिक्षणात एकूण ७० संस्था दोषी आढळुन आलेल्या आहेत. सदर ७० पैकी २ प्रकरणे आदिवासी विकास विभागाशी संबंधित असल्यामुळे सदरची कार्यवाही त्यांनी करावयाची आहे. उर्वरित ६८ प्रकरणांपैकी ४ प्रकरणात विभागामार्फत गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. १३ प्रकरणात मा.न्यायालयात प्रत्यक्ष आरोपपत्र दाखल झालेली आहेत, २८ प्रकरणात शासनाच्या कार्यवाहीच्या विरोधात मा.उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद व नागपूर खंडपीठ येथे दाखल केलेल्या याचिकेव्दारे वसुलीवर स्थगिती आहे, ११ प्रकरणात गुन्हा दाखल करण्याची आवश्यकता नाही असे संबंधित सहाय्यक आयुक्त यांनी कळविले आहे, ९ प्रकरणे न्यायप्रविष्ट असून त्या प्रकरणामध्ये स्थगिती मिळालेली नाही, ३ प्रकरणामध्ये मा.न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे सुनावणी व इतर कार्यवाही सुरु आहे. शासनामार्फत नेमलेल्या विशेष चौकशी पथकाचा अहवाल आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांच्यामार्फत दिनांक २३/११/२०१९ च्या पत्रान्वये शासनास प्राप्त झाला. सदर अहवालावर निर्णय घेण्यासाठी व त्यामध्ये त्रुटी व संदिग्धता राहू नये यास्तव विशेष चौकशी पथकाच्या अहवालावरील अद्ययावत विश्लेषण व पडताळणी अहवाल आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांच्यामार्फत मागविण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईसह महानगरातील प्रदूषण नियंत्रणात ठेवण्याबाबत

**(४९) * १७२४२ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह महानगरांमध्ये सन २०२१ च्या तुलनेत प्रदूषणाच्या आकडेवारीच्या निरीक्षणावरुन सन २०२२ या वर्षांत मुंबईच्या सर्व विभागात प्रदूषणाचा आलेख वाढत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत प्रदूषणाचे २८० दिवस, कल्याणमध्ये २८३, ठाण्यामध्ये २७६ आणि नवी मुंबईत २५७ दिवस नोंदविले गेले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील वर्षांत अनेक दिवसात ठाणे ८१, कल्याण ६०, मुंबईत ४५ व नवी मुंबई ३४ दिवस प्रदूषणाची नोंद न घेतल्यामुळे प्रदूषणाचे दिवस कमी दाखविले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबई शहरात कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव तसेच नागरिकांमध्ये वाढत असलेले श्वसनाचे आजार यावर उपाययोजना करण्याकरीता मुंबईसह महानगरांतील प्रदूषण रोखून हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

सर्वसाधारणपणे हवेतील प्रदूषकांची पातळी पावसाळ्यात सर्वात कमी व हिवाळ्यात सर्वाधिक असते. पावसाळ्यात पावसाच्या पाण्याबरोबर मिसळल्याने व समुद्रावरुन येणाऱ्या वेगवान नैऋत्य मोसमी वाऱ्यामुळे हवेतील प्रदूषणाचा निचरा होतो. हिवाळ्यात हवेच्या कमी तापमानामुळे व वेगवान वाऱ्याच्या अभावाने जमिनीलगतची प्रदूषके ही उंचीवरील हवेत मिसळण्याचे प्रमाण कमी होते. त्यामुळे सततच्या तयार होणाऱ्या प्रदूषकांचा निचरा न झाल्याने हवेतील त्याचे प्रमाण वाढत जाते.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून हवेची गुणवत्ता तपासणीसाठी मुंबईत १४, कल्याणमध्ये २, ठाण्यामध्ये ३ व नवी मुंबईत ८ ठिकाणी हवा गुणवत्ता तपासणी केंद्रे उभारलेली आहेत. सदर यंत्रणेमधून प्राप्त होणारी आकडेवारी मंडळाच्या संकेतस्थळावर प्रकाशित केली जाते. वरील शहरांची हवेची गुणवत्ता सर्वसाधारणपणे समाधानकारक ते मध्यम या गुणवत्तेत येते.

(४) हवेची गुणवत्ता सुधारण्याकरीता केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शनाखाली कृती आराखडा बनवण्यात आला असून त्याची अंमलबजावणी त्या त्या महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत गट-ब संवर्गाकरीता घेण्यात येणाऱ्या परीक्षेच्या अभ्यासक्रमात कायदेविषयक अभ्यास समाविष्ट करण्याबाबत

**(५०) * १६९४८ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने गट-ब संवर्गाच्या विविध पदांसाठी एकच संयुक्त परीक्षा घेण्याचे योजिले असून नवीन अभ्यासक्रमातून कायद्यासंबंधित विषय वगळण्यात आला असल्यामुळे पोलीस उपनिरीक्षक पदासाठी विशेष तयारी करणाऱ्या उमेदवारांचे नुकसान होणार असल्याचे दिनांक १ जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पोलीस उपनिरीक्षक पदासाठी पेपर-२ ची परीक्षा स्वतंत्र ठेऊन कायद्याचा अभ्यास समाविष्ट करण्याबाबतची मागणी लेखी निवेदनाद्वारे स्टुडंट राईटस असोसिएशनने मा.मुख्यमंत्री यांचेकडे सातत्याने केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या गट-ब संवर्गाच्या विविध पदांसाठीच्या अभ्यासक्रमात कायदेविषयक अभ्यासक्रम समाविष्ट करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) होय, खरे आहे.
(३) व (४) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित विविध परीक्षांच्या पध्दतीमध्ये सुधारणा करण्याचा निर्णय आयोगाने दिनांक ०१/०८/२०२२ रोजी घेतला आहे. आयोगाच्या परीक्षा पध्दतीतील सुधारणेनुसार गट-ब तसेच गट-क चे विविध संवर्ग एकत्रित करुन त्यांची एकच पूर्व परीक्षा आयोजित करण्यात येणार आहे. तथापि, गट-ब व गट-क साठी स्वतंत्र मुख्य परीक्षा घेण्यात येणार आहेत. त्यामुळे या विविध संवर्गाचा विचार करुन महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने परीक्षेचा अभ्यासक्रम सुधारित केला आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोग सांविधानिक दृष्ट्या स्वायत्त संस्था असून आयोगामार्फत परीक्षा प्रक्रिया राबविण्याबाबत धोरण ठरविले जाते. त्यामध्ये शासन स्तरावरुन कोणताही हस्तक्षेप करण्यात येत नाही.

-----------------

**विधान भवन :** **राजेन्द्र भागवत**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.